
# झिरपलेली किरणे

## (आणीबाणीतील कविता)



म. ग्रं. सं. ठाणें
य काव्य
क्र. २३०८

REFBK-0021693
REFBK-0021693

संपादन :
डॉ. अरुण लिमये

# झिरपलेली किरणे

आणीबाणीतील कविता

संकलन

**डॉ. अरुण लिमये**

प्रस्तावना

**दुर्गा भागवत**

REFBK-0021693
REFBK-0021693

किंमत पाच रुपये

आगीतून स्वतःच्या जे भेटले उजेडा

१. **प्रभाकर शर्मा**, वर्धा महाराष्ट्र
२. **स्नेहलता रेड्डी**, बंगलोर, कर्नाटक
३. **बहेरुलाल ललवारा**, कंकरोली, राजस्थान
४. **बिरजू शहा**, सीतामंडी, बिहार
५. **मधुकर वोबडे**, बालापूर, महाराष्ट्र
६. **शंकर वोबडे**, काटोल, महाराष्ट्र
७. **केशव कुलकर्णी**, गोंदिया, महाराष्ट्र
८. **डी. डी. पटवर्धन**, **उरण**, महाराष्ट्र
९. **गुळवणी**, सांगली, महाराष्ट्र
१०. **प्रभाकर राजे**, काटंगी, मध्य प्रदेश
११. **सोमनाथ हेडाऊ**, सेझोनी, मध्य प्रदेश
१२. **भैरव भारती**, नगडा, मध्य प्रदेश
१३. **कुलघा**, अनेकड, कर्नाटक
१४. **हरीवदन भट्ट**, सुरत, गुजरात
१५. **रामानुजाचार्य**, अयोध्या, उत्तर प्रदेश
१६. **वनभ्रय यादव**, गोंडा, उत्तर प्रदेश
१७. **विशनलाल मित्तल**, शहराणपूर, उत्तर प्रदेश
१८. **इन्द्रजितसिंह**, बुलंदशहर, उत्तर प्रदेश
१९. **कांती स्वरूप**, अनूपसहर, उत्तर प्रदेश
२०. **दोलाराम**, अभोली, उत्तर प्रदेश
२१. **चेतराम**, वरेली, उत्तर प्रदेश

२२. **नंदीसिंह**, बुलंद शहर, उत्तर प्रदेश
२३. **प्रेमसिंग**, अमृतसर, पंजाब
२४. **वैजनाथ कपिला वैद्य**, दिल्ली
२५. **मोहनलाल जादव**, दिल्ली
२६. **तिलकराज नरुला**, दिल्ली
२७. **सत्यव्रतसिंह**, प्रयाग, उत्तर प्रदेश
२८. **पांडुरंग क्षीरसागर**, महाराष्ट्र
२९. **वैद्यनाथ प्रसाद चौधरी**, वाराणसी, उत्तर प्रदेश
३०. **आढाव**, दिल्ली
३१. **गोपाळराव देशपांडे**, महाराष्ट्र

संपूर्ण भारतीय समाजाला बंधमुक्त
करण्यासाठी बंधनात असतानाच
आपली जीवने संपविणाऱ्या या व अन्य
अनेक अज्ञात हुतात्म्यांना
हार्दिक श्रद्धांजली व सविनय अर्पण.

Zirapleli Kirane
*Marathi*
Dr. Arun Limaye

झिरपलेली किरणे

© डॉ. अरुण लिमये

पहिली आवृत्ती
१९७७/१८९८

मुखपृष्ठ
दिलीप भंडारी

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
टिळक रोड
पुणे ४११०३०

प्रकाशक
डॉ. अरुण लिमये
११९५/१ नंदादीप हॉस्पिटल
फर्ग्युसन कॉलेज रोड
पुणे ४११००५

एकमेव विक्रेते
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ४०००३४

## वाचकांसाठी

मी कोणी कवी नाही.

कवींच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता मात्र आहे.

गेल्या १८ महिन्यांचा काळ जीवघेणा होता.

सप्तस्वातंत्र्ये हिरावली गेली.

सर्जनशील कलाकारांना घुसमटल्याचा अनुभव आला.

या स्थितीत मराठी कवींनी आपल्या भावना शब्दांकित केल्या.

पण या रचना रसिकांपर्यंत पोचूच शकल्या नाहीत.

प्रकाशाला कोठडीत अडकवून सूर्याला क्षितिजावर उगवायची बंदी घातली होती !

तरी साधना, कर्तव्य, मराठवाडा, सोबत, मौज, विवेक, एकता यांच्या अंकांतून किरणे झिरपलीच.

त्या कविता व इतर अप्रकाशित रचना यांचे हे संकलन. ते करताना कवीची भावना व उत्स्फूर्त प्रामाणिकपणा यांना प्राधान्य दिले आहे. त्यामुळे या संग्रहात जशा उत्तम कविता आहेत, तशाच त्यामानाने कमी दर्जाच्या काही कवितांनाही स्थान आहे. हा संग्रह वाचकांहाती देताना समाधान आहे. प्रकृतीच्या विकलांग स्थितीत मी अधिक काही करू शकत नाही याचे दु:ख आहे.

एकाच विषयावर सर्व कविता असल्याने येणारा एकसुरीपणा रसिक वाचक समजून घेतील ही आशा आहे.

या संग्रहाचा उपयोग, प्रचारासाठी जागजागची कलापथके व तरुण मंडळी कदाचित करून घेऊ शकतील. परंतु संग्रहाचा हा प्रधान हेतू नाही.

अद्याप आणीबाणी संपूर्णत: उठलेली नाही. व आक्षेपार्ह मजकूर प्रकाशनासंबंधी कायदा अस्तित्वात आहे याची मला जाणीव आहे. परंतु सत्य-असत्याशी मन ग्वाही करूनच हे संकलन प्रकाशित होत आहे.

परिणामांची क्षिती आजवर केली नाही. यापुढेही बाळगणार नाही.

दुर्गा भागवतांची प्रस्तावना या संग्रहाला लाभली हे मी माझे भाग्य समजतो. या कामात मला मदत करणाऱ्या कु. तिलोत्तमा देशपांडे, कु. अंजली कुलकर्णी, कु. वीणा पटवर्धन व अश्विनी मार्कंडेय या युक्रांदीय व इतर सहकाऱ्यांचा मी ऋणी आहे. छपाईचे काम सुबक व त्वरेने करून दिल्याबद्दल कल्पना मुद्रणालयाचे श्री. चिं. स. लाटकरांचे मन:पूर्वक आभार मानतो. श्री. राजाभाऊ माटे व कवियत्री अनुराधा पोतदार तसेच दिलीप भंडारी यांनी केलेल्या मदती-बद्दल ऋणी आहे. कवितांच्या पुनर्मुद्रणाची परवानगी दिल्याबद्दल नियतकालिकांच्या संपादकांचा मी आभारी आहे. ज्या प्रथितयश व नवोदित कवींनी आस्थेने सहकार्य दिले त्यांच्या ऋणात मी कायमचा राहू इच्छितो.

घाईगर्दीत या संकलनात ज्या उणिवा राहिल्या त्यांचा सर्व दोष माझा आहे. रसिक वाचकांना हा संग्रह लोकशाही संरक्षणाची प्रेरणा देवो हीच प्रार्थना !

पुणे, १-३-७७ **डॉ. अरुण लिमये**

## प्रास्ताविक

हा काव्यसंग्रह प्रासंगिक आहे. आणीबाणीच्या काळी जनमानसात जी व्यथा उमटली, जी चीड उफाळून वर आली त्याची ही साक्ष आहे. प्रासंगिक कविता पुष्कळदा प्रचारी कविता म्हणून संबोधली जाते; तिचे काव्यमूल्य उतरते असते असे मानले जाते. पण या संग्रहातल्या प्रत्येक कवितेत ज्या व्यथेचा आविष्कार आढळतो तो केवळ कालिक, प्रासंगिक किंवा प्रचारकीही नाही. मानवतेच्या इतिहासातला तो एक स्पष्ट उद्गार आहे.

आणीबाणी म्हणजे अंधार, हे सर्वांना जाणवले. लोकशाहीवर हुकूमशाही मात करते आहे. पण लोकशाही अमर आहे हा विश्वास अढळ आहे. प्रा. ना. र. टिळक 'लोकशाही' या कवितेत म्हणतात:

दिसतो आहे पूर्ण क्षितिजावर शुभ्रप्रकाश,
शांत प्रकाश, जयप्रकाश.

संपूर्णपणे प्रासंगिक कविता पण हे शब्द विकाऊ नाहीत. प्रतीतीचे बोल आहेत.

'हे सूर्यदेवा!' ही रमेश पानसेंची कविता नारायण सुर्वे यांची 'कावळा' कविता माहीत असल्यास जास्त अर्थपूर्ण वाटेल. ही ही प्रासंगिक कविता.

पण अशा कवितेतही अंधार व उजेड, रात्र आणि पहाट या प्रतीकांचा वापर केलेला आढळतो. वसंत वरखेडकर म्हणतात,

एक पहाटच अशी उजाडली
ज्या दिवशी सूर्य उगवलाच नाही
क्षितिजावर उगवली एक दुष्ट शक्ती
मुठीत आमच्या अंधकार घेऊन
त्या दिवशी पाखरांनी किलबिल केलीच नाही.
रातकिड्यांचं कर्कश ओरडणं थांबलंच नाही.
कुणाच्या मनात या ओळी ठसणार नाहीत ?

वा. रा. सोनार म्हणतात :

तुझ्या मरणाचा हिशेब करू नकोस.
तुला जन्मापर्यंत मागे जावे लागेल.

जन्मापासून मरणापर्यंतची वाटचाल आम्हाला कळते. पण मरणापासून जन्मापर्यंत मागे जावे ? ते तर विपरीताचेच लक्षण. छे ! मागे पाहायला धजावणारा माणूस दुर्मिळच असतो.

या संग्रहातली मला सर्वात आवडली ती प्रा. वसंत बापटांची 'विद्यापीठ' ही कविता. भलत्या विद्यापीठात आम्ही शिकलो आणि फसलो. टिळकसर स्वराज्याचा अर्थ चुकले. असे म्हणून मोहनदास मास्तर, पंडितजी बोसमोशाय सारेच आता नको ते शिकवून गेले. हे धडे विसरायचे कसे नि गिरवून त्यांचा काय फायदा या आणीबाणीच्या राज्यात ?

नचिकेत, 'स्थानबद्ध' या कवितेत म्हणतो.

जेलच्या दरवाज्यात
पाय ठेवला रुबाबात
काळाच्या विळख्यात
घरच्यांची प्रापक्षात
हाल झरले अतोनात.

याच हालांचे खतपाणी घालून नव्या युगाचे हे पाईक मानवी स्वातंत्र्याचे मरू घातलेले रोप जगवू पाहताहेत.

विजया कुलकर्णी म्हणते,

या घराच्या चार भिंती
तुरुंग झाल्यात

............

मुडदा पाडलास
माणुसकीचाच
अहंच्या नशेत
अहंसाठीच
रातोरात.

जेलमधला कैदी बाहेरच्यांचे हाल पाहतो. तर घराघरांतला कैदी माणुसकीचाच मुडदा बघतो. हे उद्गार प्रसंगिक म्हणून डावलून चालणार नाहीत. हे रक्षून ठेवायलाच हवेत.

बा. भ. बोरकर नाणावलेले कविवर्य. ते म्हणतात,

सूळ सच्च्यांच्या कपाळी, तूप लुच्चा राउळी
पंढ झाल्या पंडितांना, शाल जोडी खाटले.

मंगेश पाडगावकरांची 'भिंत' ही कविता अविस्मरणीय आहे.

कुसुमाग्रजांची 'मुक्त' ही कविता वाचताना विद्ध झालेला उडता पक्षी आपल्या रक्ताची नागमोड जमिनीवर पडल्या पडल्या काढतो आहे, ही कल्पना व्याधाला फिरून धिक्कारते आहे. वाल्मीकीने धिक्कारले तसे. कलापीने धिक्कारले तसे. नारायण वामन टिळकांनी धिक्कारले तसे.

पण ही नक्षी नाही. हे हृदयाहृदयावरचे अमर गोंदणे आहे. आणि त्याला आता आकार आणि उद्गारही गवसला आहे.

**दुर्गा भागवत**

# झिरपलेली किरणे

आणीबाणीतील कविता

## मला काय त्याचे !

स्मरा मंत्र सोपा, वदा नित्य वाचे
मला काय त्याचे, मला काय त्याचे

जरी देव कारागृही बद्ध झाले
जरी दैत्य सत्तामदे धुंद झाले
तरी सोंग संपादणे नेणत्याचे...

जिथे वल्गना हाच खासा उपाय
जिथे कायदा हीच अंतीम सोय
तिथे ध्यान सांभाळणे कोडग्याचे...

वरी लोकशाही उरी एकशाही
जनी नेकशाही मनी लेकशाही
अशा पर्वकाळी नगारे जयाचे...

करू तीच प्राची, म्हणू तेच सत्य
धरू तीच नीती, गणू तेच तथ्य
अशा पर्वकाळी जथे जोगत्यांचे...

अनर्थाचिया मांत्रिका वक्र पाहे
असा होयबामंडळी कोण आहे
कुणा लोचनी स्वप्न जागे उद्याचे...

म्हणे बापजादे कुणी थोर होते
कृतीवीर होते रणी धीर होते
कशाला उगा नाव सांगा पित्याचे...

कुणी सत्यधर्मा मरू दे सजेत
कुणी क्रूरकर्मा चरू दे मजेत
किती आपुले भाग्य हे पाहत्याचे...

अशा काळरात्री असो पेय पात्री
घडो भोग गात्री जडो नीज नेत्री
अहा धन्य व्हावे जिणे हे किड्याचे

स्मरा मंत्र सोपा, वदा नित्य वाचे
मला काय त्याचे, मला काय त्याचे! ॥ ८ ॥

विलिंग्डन कॉलेज,
सांगली.

गं. ना. जोगळेकर

## तेव्हा आणि आता

तीच झोपडी
जिथे पणजोबा जन्मला...;
तीच झोपडी
जिथे आजोबा जन्मला...,
तीच झोपडी
जिथे पिता जन्मला...,
तीच झोपडी
जिथे पुत्र जन्मला...,
तीच झोपडी
जिथे नातू जन्मला...;
तीच झोपडी
तेच गटार...,
तीच दुर्गंधी
तोच अंधार...!

'घोषणाही' तीच आहे
देश गुलामीत होता
आज स्वातंत्र्यात आहे?

मुंबई. चंद्रकांत पंढरीनाथ इसई

## भिंत

भिंत माझ्याभोवती
भिंत तुझ्याभोवती
भिंतामि भिंतावः भिंतामः
भिंती भिंती सर्व गडे
इकडे तिकडे चोहिकडे
भिंत भीतीची
भीती भिंतीची
भिंतीला कान असतात
म्हणून प्रत्येक भिंतीला
भीती प्रत्येक भिंतीची
लहान लहान भिंतींची
एक प्रचंड भिंत
अदृश्य कोंडणारी

भिंतीसमोर उभे रहा
जीभ कापून उभे रहा
कानात बोळे उभे रहा
डोळे बंद उभे रहा
खाली बसा. उभे रहा
कान धरा. उभे रहा

कोणीतरी हरवला
कोण बरे ? कळलेच नाही !
चौघांची वाचा गेली
कोणाची ? कळलेच नाही !
तिघांचे डोळे गेले
कोणाचे ? कळलेच नाही !

एक साथ आवाज द्या
" सर्व भिंती सर्वांच्या कल्याणासाठी "
एकाने आवाज दिला नाही
तो दिसेनासा झाला
कोण बरे ? कळलेच नाही !

भिंतीची सवय होईल.
सवयीची भिंत होईल
भिंतीला शिक्षा हवी
शिस्तीला भिंत हवी

एक दोन तीन चार
भिंतवाल्यांची डोकी हुषार
जय बोला हो जय बोला
या भिंतीचा जय बोला

मुंबई

**मंगेश पाडगावकर**

## आम्ही स्वतंत्र झालो ?

आम्ही स्वतंत्र झालो हे साफ साफ खोटे
जात्याच काही होते आश्चर्य हेच मोटे
त्यांच्यातही निघाले संग्रामसिंह थोडे
बाकी अखेर झाले स्पर्धेतलेच घोडे
जे पेटले तयांनी केला खडा बखेडा
आगीतुनी स्वताच्या ते भेटले उजेडा
त्यांच्यात एक होता माथा हिमालयाचा
पुण्यप्रभाव गाजे लोकी तिन्ही जयाचा
त्यांच्यामुळेच आला आम्हा जगी उजाळा
झालो स्वतंत्र ऐसा आम्हांहि भास झाला
होतो तसेच आहो लाचार लाळघोटे
जे हाणिती बुटांनी त्यांचेच बूटचाटे.

गोवा

बा. भ. बोरकर

## लोकशाहीचा नवा आशय

भारताने म्हणे धरली आहे
लोकशाहीची कास !
नागरी हक्कांचा येथे झाला आहे ऱ्हास
निरपराध्यांसाठी तयार आहेत फास
मनातलं काही बोलू नका
दुसऱ्यांच्या मनातलं वाचू नका
लोकशाहीचा फक्त ऐका आवाज !
...वर्तमानपत्रांतून लोकशाही

आकाशवाणीवरून सुद्धा " लोकशाही "
तोंडे बांधून तुम्ही जगता आहात
ती सुद्धा लोकशाहीच !
लोकशाहीत तुरुंग तुडुंब आहेत
न्याय, न्यायालये यांची ' भानगड ' नाही
' राष्ट्रहिता ' शिवाय दुसरा न्याय नाही !
बाह्यशत्रूंपासून धोका, अंतर्गत शत्रूंपासून धोका
"धोका" ! नाही कोठे धोका ?
लोकशाहीच्या स्वातंत्र्याला धोका
नि स्वातंत्र्याला लोकशाहीचा धोका !
"लोकशाहीच्या" हाती बंदूक, मतभेदांना बंद करण्यासाठी
लोकशाहीत मतप्रदर्शन नसतं...
फक्त 'निष्ठा' प्रदर्शन हवं असतं !
न्यायालयांना विशाल ( ! ) दृष्टी नाही !
विरोधी पक्षांना समजत नाही !
पक्षातल्या लोकांना निष्ठा नाही !
परदेशांना आमचं वघवत नाही !
म्हणून हाती बंदूक घेऊन लोकशाही म्हणते--
" गांधींच्या या अहिंसक देशात
अहिंसा बंदुकीच्या नळीतून येईल ! "
इथे एकच पक्ष राहील
नेता पण एकच राहील
याचं नाव मात्र "लोकशाही" राहील.

**जे. जे. जोशी**

## अंगार

आकाश पांघरूनि निद्रिस्त आज सारे
ही आग पेटलेली तरि थंड का निखारे ?
आमच्याच हाती आम्ही, बांधून शृंखला ह्या
आम्हीच कैदि झालो अन् भिंति बांधिल्या ह्या
बंदिस्त या जगाची उघडील कोण दारे ?
ते भव्य राजवाडे, सुख आणि वैभवाचे
जळतात सावलीला संसार झोपड्यांचे
उद्ध्वस्त जळत जाती सुखस्वप्निचे मनोरे
अंधारल्या दिशांना भेदून दिव्य ज्योती
आकाश फाडुनिही गर्जेल आमुची माती
आमच्या स्वतंत्रतेला बांधील कोण का रे ?
ही आग प्राशुनिया आम्हीच आग झालो
फुलत्या फुलांमधूनि अंगार आज झालो
जाळून बंधने ही तोडून टाकु दारे
हसती असहायते र आमच्याच आज कोणी
रडतील ते उद्याला न पुसणार अश्रु कोणी
आमच्याच आसवातून फुलतील हे निखारे

पुणे **अशोककुमार त्रिभुवन**

## एक जीव जगत आहे....

( जनतेच्या दैनंदिन अत्यावश्यक गरजा भागत नसताना हजारो रुपयांचा दैनंदिन खर्च करून आलिशान चैनी जीवन जगणाऱ्या 'गरिबी हटावो' या घोषणेच्या संवर्धकांना, गरिबीत जन्माला येऊन गरिबीतच मेलेल्या असंख्य पामरांचे आत्मे स्वर्गातून हसत आहेत. अशाच एका गरिबीने पिचलेल्या, 'हरलेल्या' गरिबाच्या मरणजिण्याचे हे शब्दचित्र आहे-- )

## एक जीव जगत आहे...!

एक जीव जगत आहे पण ते जिणे मरण आहे !
मरताच येई ना जिणे जगा दया न येई कुणा अगा !
दोन शिते जातात पोटात, क्षुधाग्नीला ती शमवतात
दोन घोट पाणी जाते, ते तर अग्नी विझवून टाकते !
भूक त्याची मरते, जिणे त्याचे जगते
पण जातो मनाला तडा, शिजतात हृदाच्या कडा
अंगी लाही लाही होते
रक्त त्याचे आटत जाते
रक्ताच्या लाटे-लाटे
आग बाहेर ओकत येते......
एक शब्द फुटत आहे पण कोणी तरी तो दाबत आहे
एक जीव जगत आहे पण ते जिणे मरण आहे !
'अन्न-वस्त्र द्या' हाक हीच ती, शब्द न कोणा मानवती
शब्द तिथेच अडून बसतो, श्वास त्याचा कोंडून असतो,
ज्वालाग्नीचा स्फोट होतो, ध्वनी त्यातून कण्हत वाहतो
पण मरण त्याला कुठचे येते, मिळते पाणी दोन शिते
पुन्हा तीच हृदयफोड
तीच ती डोळेफोड
पुन्हा तेच मरणजिणे
क्षोभ ज्वाला यांचे जिणे......
एक जीव जगत आहे, पण ते जिणे मरण आहे !

पुणे

**वसंत मो. मेहेंदळे**

## ते बिचारे !

—— ते म्हणाले
" आमचं दुःख आम्हाला परत द्या "
तेव्हा त्यांनी त्यांना राहायला पर्णकुटी दिली
खायला मुबलक अन्न दिलं
नेसायला कपडेलत्ते दिले
आणि बजावून सांगितलं,
" आता तुम्ही सुखी आहात
आम्हाला काही मागू नका
तुमचं दुःख आमच्या हृदयापाशी राहू द्या."
तेव्हा ते परत म्हणाले,
" आमचे हक्क आमच्यापासून हिरावून नेऊ नका
आमच्या हक्काचा सूर्य
आमच्या पर्णकुटीत तळपू द्या."
तेव्हा त्यांनी रागारागाने
त्यांच्या जिभा छाटून टाकल्या
त्यांचे हात कापून टाकले
त्यांचे पाय कापून टाकले
त्यांनी कुठेच काही बोलू नये म्हणून
त्यांनी काहीच लिहू नये म्हणून
त्यांनी कुठे जाऊ नये म्हणून

ते बिचारे अपंग होऊन
आपल्या काळवंडलेल्या हक्काच्या सूर्याला
जोजावत बसले;
तेव्हा त्यांनी त्यांच्या पाठीवर
आसुडाचे अनंत फटके मारले
अन् वर म्हणाले,

"घ्या आपल्या दुःखाला आता आपल्या पाठीवर."
तेव्हा त्यांच्या डोळयांतील आसवांनी
लाचार होऊन तडजोड केली
त्यांचं अस्तित्व मान्य केलं
त्यांनी घातलेली प्रत्येक अट मान्य केली
त्यांचं सुख ते आपलं मानलं
आपल्या रक्तानं त्यांच्या सत्तेचे दिवे तेजाळत ठेवले.
आपल्या झोपडीतच राहून; भुकेकंगाल होऊन
कपडेलत्ते झुगारून, नग्न होऊन
आपल्या दुःखाला आपल्या पाठीवर घेऊन
खुशाल त्यांचे पोवाडे गात बसले—

तेव्हा त्यांच्या हक्काचा तळपणारा सूर्य
काळाठिक्कर होऊन पडला होता;
कापलेल्या हातापायांतल्या रक्तातल्या पेशी
ओशाळून रडत होत्या.
शब्द तोंडातच अशब्द होऊन बसले होते.

तेव्हा त्यांनी,
त्यांचं सांडलेलं रक्त पाहिलं
रक्तातल्या पेशींचे ओशाळणे पाहिले
डोळ्यांतले केविलवाणे आसू पाहिले
ते आसू दिसू नयेत म्हणून
त्यांनी त्यांच्या डोळ्यांवर
त्यांच्याच रक्ताने माखलेले चष्मे लावले...

**नंदकुमार शेंडगे**

## सत्य न मरते

तव यशा आणिती लांच्छन रे
लाडकी सकल ही तव पोरे

पूर्ण आंधळा तू धृतराष्ट्रा
बांधी गांधारी निज नेत्रा
पुरे फावले सहजी पुत्रा
उधळाया निज गुण सारे

भीमाचे बळ उसळया घेते
धर्म घालितो लगाम त्याते
म्हणुनि काय त्या शांतिवनाते
दावावि कारागारे ?

गुलाम झाली द्रुपदसुताही
म्हणुनि हिला का लाजचि नाही
हिच्या हिसकती निरीस पाही
इभ्रतिचे पिउन वारे

हाक सतीची कोटिमुखांनी
फुटते, परि ती यावी न कानी
यास्तव भवती तुझ्या सुतांनी
बंद गमे केली दारे

दिसे न, ऐकु न ये, परि न कळे
की सिंहासन तुझे डळमळे ?
आवर बाळे थांबवि चाळे
सत्य न मरते दळभारे

पुणे

महाराष्ट्र-कवी यशवंत

## एका युगाचा अंत

एका युगाचा अंत
पुन्हा होत आहे
हाती आसूड धरून
हुकूम होत आहे
सर्वस्व गमावलेले चोमडे
मनोमन फळत आहेत...

...एक स्वप्न पडले
याच जागी कुणी
अहं ब्रह्माऽस्मि म्हणाले
घरादारावर तुळस ठेवून
एकेक पुरुष धावले...

...एक धावला—
सकळगुणसंपन्न झाला
योद्धे मिळवून—
राज्य मिळवून बसला...
'मऱ्हाटी' अवलाद म्हणून
मस्त नाही झाला
सर्वस्वाचे तेज सांडून गेला...

...एक धावला
डोइस रुमाल
हातात काठी—
धीर गंभीर झाला ..
स्वातंत्र्याचे रहस्य सांगून
धुंदीत मेला...

...एक धावला--
पांढऱ्या पटकुरात—
जग फिरला—
स्वातंत्र्याचे शीड धरून
घरात आला—
दिशा फिरवून—
शीत वन्ही शांत झाला
दिवा कायम पेटला...

...हे असे कसे झाले ?
इथेच का ते स्वप्न पडले ?
...रात्र संपून
दिवस नाही
जीभ असून
आवाज नाही
दात असून
डंख नाही...

...एक सुलतान जातो—
त्याची जागा दुसरा घेतो
ऐषो आराम करून—
एकदम नेता होतो—

...एकेक चोमडा येतो—
भावी मालक म्हणून—
त्याच्या भोवती
फेर धरतो...नाचत सुटतो

...पोपट पिंजऱ्यात आहेत
...रक्त थिजले आहे—
एका युगाचा अंत—
पुन्हा होत आहे...

**नारायण प्रल्हाद आवटी**

## काळजी

निष्ठावान नागरिकांनो
भू‌ऽक भूऽक ओरडता काय ?
सागरमार्गे येत्या संकटांची
तुम्हास क्षिती नाहीच काय ?
देश एवढ्या संकटात असता
वेतनवाढ कसली मागता ?
संकटांच्या असता राशी
आणीबाणी काढणार कशी ?
देश आता बदलला आहे
अणुयुगात चालला आहे –
सांगा भुकेने वाकलेल्यांना
' आर्यभट्ट ' पाहून ताठ बना.
भुकेचे हे आवरून रडे
' अणुस्फोटा 'चे गा पोवाडे
परग्रहावर लावण्या झेंडे
सरकार आता गुंतले आहे
तुमच्या पोटाचे तुम्हीच बघा
सरकार वेगळ्याच काळजीत आहे.

ठाणे

**रमेश पानसे**

## निवारा

धरणीवर कोसळली
वळवाची सर
भुईसपाट झाले
मज गरिबाचे घर !
अंधारल्या दिशा
दुःख आपलेच आपल्याला
वीजहि का व्हावी वैरिण
दुःख दावितसे जगाला !
विश्वाच्या पसाऱ्यात
मज गरिबाचा पसारा
आभाळ फाटले आता
कसा उभारू निवारा ?

पुणे

**सुधाकर शिंदे**

## जग काय म्हणेल ?

जग काय म्हणेल
मी डरत नाही,
काय होईल ते होवो
तमा बाळगत नाही –
आग भडकली आहे
भडकलेल्या रडक्या मना,
जळफळीने उभारला आहे
लाल विषारी फणा –

वेंबीच्या देठापासून ओरडून
सुकला माझा घसा,
हे कृतघ्नांनो ! नीचांनो ! !
खुशाल मला हसा –
नकोत मला तुमचे उपकार ( ? )
नको मला दान,
द्याल का परत मला ( ? )
घेतलेले प्राण –
चार भिंतिंच्या या तुरुंगात
कशाला कोंडलंत गरिबाला,
हे थापाड्यांनो ! राज्यकर्त्यांनो !
कोंडून टाका गरिबीला
स्वातंत्र्याचा झाला उदय
दाह झाला अनिवार,
हे स्वातंत्र्य म्हणजे काय ?
ही सावली ! की अंधार ?–
बेबंद राक्षसी मन आता
आवरणे मुश्कील झाले,
आता मात्र घेउनी मशाल
ह्या नराधमांची राख करेल –
अन्यायाच्या, दडपशाहीच्या
संपवून टाकू आता गाथा,
ठेचून टाकेल वारसदारी
खवळलेली आता ‘ जनता ’––

नासिक रवि

## एक विरूपिका

त्यांनी पदर ओढला, म्हणून तिने पातळ सोडले;
खरा प्रकार एवढाच झाला.
मी म्हणालो, " ओढणारेच गुन्हेगार."
तू म्हणालास, " सोडणारीच गुन्हेगार."
कुणी म्हणाले, " अरे यार, मजा आला;
गुन्हा शोधणारेच गुन्हेगार."
पहिला वकील, " १२१५ अ, १९५० ब, १९७५ क्ष "
दुसरा वकील, " १२१५ ब, १९५० अ, १९७५ ज्ञ "
पहिला जड्ज, " गुन्हेगार हात ठरतो, माणूस नव्हे."
दुसरा जड्ज, " पदर कुठे संपतो आणि पातळ कुठे सुरू होते,
हे सांगणे कठीण आहे; वाऱ्याला विचारा."
खरा प्रकार एवढाच झाला;
त्यांनी पदर ओढला, म्हणून तिने पातळ सोडले.

मुंबई

**विंदा करंदीकर**

## सूर्य

उद्या उगवणारा सूर्य
काळोख घेऊन उगवेल की काय
या संभ्रमात
येणारी प्रत्येक रात्र तशीच मावळत आहे
जीवनावर निष्ठा असणाऱ्या अनेकांची ससेहोलपट
आज एव्हरेस्ट काबीज करीत आहे.
आणि असंख्य पंख तुटलेले जटायू

उदासीनतेचा सागर ओलांडू शकत नाहीत
कारण...
डरकाळ्या फोडणारा आणीबाणीचा राक्षस
सापडेल त्याला थडग्यातच पोचवीत आहे
कदाचित कुणाचे कांवडे वांग देईल म्हणून
संशयाची पिशाच्चे
पृथ्वीला वेढून जागता पहारा करताहेत
आणि...
मातृभूमीत पुरून घेण्याची अभिलाषा धरून सुद्धा
आम्ही अजून जगतोच आहोत,
उगवत्या सूर्याच्या काळोखाची वाट पहात
आम्ही जगतोच आहोत
मेल्या मुडद्यागत... मेल्या मुडद्यागत

कोल्हापूर **जयवंत उरणकर**

## अजून देखील

खरे आहे, शिजवत नाहीत आता माणसे माणसांना
नव्या विधानसौधाखाली नरबळी पुरला नाही
चंगिझखानाचा नुकताच निर्वंश झाल्यावर
तशी कत्तल करणाराही आता कोणी उरला नाही.
हेही खरे, शत्रूचेही जिते शरीर सोलत नाहीत
एक एक त्याचा अवयव काढत नाही कोणी उपसून
कायदेशीर मार्गाने डोळे बंद करीत असतील
मात्र डोळे फोडत नाहीत तप्त सळी आत खुपसून
अडीच हजार वर्षांनंतर अखेर बुद्ध विजयी झाला
येशूचेही पुनरागमन जवळपास झाले आहे

नौखालीत एकट्याच फिरणाऱ्या त्या महात्म्याला
मरणोत्तर ( तिसरा वर्ग ) वीरचक्र दिले आहे.
आता कोणी शत्रू नाहीत आणि क्वचित असला तरी
सनदशीर मार्गानेच आम्ही त्याचा काटा काढतो.
एकच महासंकट आहे... किंवा त्याचा संभव म्हणा...
अजून देखील बंदीगृहात देवकीचा आठवा वाढतो !

मुंबई

**वसंत बापट**

## ' हे शिशुपाला '

' जयप्रकाशजींना लाठी बसली आणि
त्यांचं रक्त ओघळलं -- '
गंगेच्या पाण्याहून पवित्र असलेलं
तुझं रक्त !
आज ह्या वसुंधरेवर सांडलं आहे !
हृदयाच्या किनाऱ्यावर त्वेषाच्या
लाटा उसळत आहेत
तरीही विवेकाचे बांध घालायला
आम्ही ' संत ' नाही
आम्ही आहोत दुर्वास !
अन्यायाचा जाब विचारणारे
तुमचे कर्दनकाळ !
सौभाग्यवतीच्या कुंकवासारखं पवित्र
असलेलं तुझं रक्त
भूमातेवर दलितांच्या आसवांसारखं
सांडलं आहे

लक्ष लक्ष हृदयांतून अंगाराचा लाव्हारस
वहात आहे
भ्रष्टाचाराच्या किडीनं देशाचं झाड
वठलं आहे
तुझ्या रक्ताच्या स्पर्शानं पालवी फुटेल
ह्या झाडाला !
संजीवनीच्या त्या स्पर्शानं चैतन्याचे
कोंब फुटतील
तुझ्या रक्ताचा थेंब पिऊन पवित्र झालेली
ही धरती
कर्णाच्या रथाचं चाक गिळणारी
ही धरती
सूर्यासारखं असलेलं तुझं तेज पाहून
हजारो कुर्बानं करायला,
धरतीवरती वार झेलायला
पुन्हा सज्ज होईल
पुन्हा पुन्हा सज्ज होईल !

नासिक **सौ. अनुराधा औरंगाबादकर**

## ' बंड आता थंड झाले '

बंड आता थंड झाले, रक्त सारे गोठले
पेटलेसे वाटले जे तेहि आता आटले !
पुण्य ज्यांनी पेरिले छातीत गोळ्या झेलुनी
गुंडपुंडांनी, ठगांनी पीक त्याचे लाटले
लाख झाले खाक त्यांची राखही आता नुरे
तीहि खाणाऱ्या गिधांचे बूड तख्ती थाटले

सूळ सच्च्यांच्या कपाळी तूप लुच्च्या राउळी
पंढ झाल्या पंडितांना शालजोडी खाटले
मंत्र ज्या ज्या ऋत्विजांनी यज्ञकाळी गाइले
वंदने सत्ताधिशांच्या शील त्याचे वाटले
चीड जो ठासून आहे दारवेच्या सारखी
जाण तू माझ्या मना आकाश नाही फाटले

गोवा **वा. भ. बोरकर**

## त्याला अजून लिहायचंय

लिहिणारा तो –
संपला त्याच दिवशी
ज्या दिवशी
ती अचानक टपकली
तिच्या रूपशृंगाराला
अनेकजण भाळले
त्यानं मात्र त्याच्या चष्म्यातून
तिचं घाणेरडं रूप
निरखून पाहिलं
अन् –
त्याच दिवशी
त्याला अटक झाली
तिचा म्हणे विनयभंग झाला
त्या अंधारकोठडीत
कल्पनातीत यातना तो
सहन करतोय

तरी तो समाधानी आहे.
पूर्वी ज्यांनी तुरुंग भोगला
त्यांना म्हणे पेन्शन झाली
अन्,
तीच मोकळी जागा
त्याला मिळाली
त्याला समाधान
इतकंच आहे
रोज तो नवंच ऐकतोय
तुला काही बरंच मिळतंय
मग तू उदास का ?
तुझं सुख पहायला
त्याला अजून जगायचंय
तुझ्या सुखावर त्याला
अजून लिहायचंय !

विटे ( सांगली ) **प्र. दि. शिराळकर**

## "आणीबाणीस"

या घराच्या चार भिंती
तुरुंग झाल्यात
प्रकाशाला गिळणाऱ्या
पुढे पुढे सरकतात
अंधाराची बोटे लांबवून
माझ्या श्वासांनीही
मुके व्हावे म्हणून,
जखडलेल्या मनाचे बांध

मुडदा पाडलास
माणुसकीचाच
अहंच्या नशेत
अहंसाठीच,
रातोरात !
गायचे म्हणून गाण्यासाठी
विलगलेल्या ओठांनी
विकल झालेल्या
मनपाकळ्यांना
अंधाऱ्या गुहेत
लपवून ठेवले,
सखे आणीबाणी
तू आलीस म्हणून !

कोल्हापूर — **विजया कुलकर्णी**

## लोकशाही

कोठे आहे लोकशाही ?
कोठे आहे
व्यक्तिस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य,
विचारस्वातंत्र्य ?
खरे बोलण्याची सोय नाही
खोटे बोलण्याची सवय नाही.
राणीकी जय बोलवत नाही.
कारण अभिमान सोडवत नाही.
जे जनतेचे जनतेसाठी

आणि जनतेतून उगवले,
त्यालाच आली कटू फळे
दुराग्रहाची, हुकुमशाहीची
सगळीच झाली का मेंढरे
एकाच दावणीची ?
सगळेच झाले का नंदीबैल
माना डोलावण्यापुरते ?
वाटतंय की आला आहे जगाचा अंत
होईल आता प्रलय
आलाय देवाच्या न्यायाचा दिवस
कारण दाटला आहे सगळीकडे
निराशेचा अंधःकार
आणि तो पहा –
दिसतो आहे पूर्व क्षितिजावर शुभ्र प्रकाश
शांत प्रकाश, जय प्रकाश.

**प्रा. ना. र. टिळक**

## बळी

'इन्कलाब झिंदाबाद' च्या निनादानं
उजळून निघालेलं क्षितिज
आज निस्तेज होऊ पाहातंय......
शब्दाच्या आगीतून बाहेर पडणाऱ्या ज्वाला,
तलवारीची धार नि बंदुकीतून सुटणारी गरम गोळी......
चीत्कारातून साकारलेलं ते स्वप्न;–
नुसती भंगलेली शकले त्याची
पहाताहेत आमचे हुतात्मे !

त्यांचे आत्मे ! !–
कुणा हुकूमशहाच्या सत्तालालसेनं
घेतलेला आमचा बळी……
आमचे सोस नि आमची चमचेगिरी……
दुःखाच्या उद्रेकानं,
गळतात
नकळत आसू त्यांचे !
त्यांच्या रक्ताच्या बीजातून उगवलेले
शिल्पकार……
खच्ची होऊन पडलेले आहेत
बोळाबोळातील गटारात, झोपडपट्टीत……
आणि अश्रित होऊन जगताहेत
त्यांच्याच मायभूमीत……
लोकशाही राज्यात;
लोकांनीच चालवलेल्या……

**नंदकुमार शेंडगे**

## तिळगूळ घ्या बोला गोड

तील तील जीव शब्दांचा गूळ
विरोध करण्याचे सोडा खूळ
बाईचा कशाला उठवता शूळ
सोडून द्या नेहमीची खोड— तिळगूळ घ्या

एकता अनुशासन तरक्की
फिरते आहे लाचार चक्की
बाईची भूमिका ठाम पक्की
वीस कलमी मण्यांची ओढ— तिळगूळ घ्या

कशाला हवा कायदे-भंग
जनतेचा होतोच विनय-भंग
संसदेचा फक्त धरावा संग
निवडणुकीसाठी काढू तोड— तिळगूळ घ्या

संप नको—सत्याग्रह नको
सभा नको-मोर्चे नको
घेराव नको—सुरुंग नको
नन्नाचा पाढा—शांतीचा रोड— तिळगूळ घ्या

घ्या आता लढा मागे
म. गांधी इतिहास सांगे
उगीच कशाला सजवता सोंगे
वालांनो देशाची अशाने होइल फोड— तिळगूळ घ्या

मिसा आणि आणीबाणी
घटनादुरुस्ती आकाशवाणी
टी. व्ही. सेन्सॉर बंद मुखवाणी
लोकशाही देशात विचारांना मोड— तिळगूळ घ्या

इंदिरा म्हणजेच—इंडिया
तोच भारत—असली आयडिया
तुम्हाला वाटतं- गूंगी गुडिया
वरी जित्याची मेली खोड— तिळगूळ घ्या

संजय म्हणजे आपलीच प्रजा
तुम्हाला वाटतो पुत्र राजा
प्रजासत्ताकाची बघावी मजा
पाच कलमी योजनेत नशींची तोड— तिळगूळ घ्या

त्रिवेणी काटचा कुंभमेळा
गुप्त सरस्वती यमुना गंगा
गंगादास—यमुनादास

इहवादाचा नमुना खास
कपाळी लावा चंदनी खोड-- तिळगूळ घ्या

फेरीवाले हटवा-झोपडीवाले हटवा
भिकारी हटवा-शहरे नटवा
गरिबाला कटवा-समाजवाद पटवा
लोकशाही समाजवाद-इहवादी समाजवादी
भारताचा जयजय संजयकार असो !
तिळगूळ घ्या बोला गोड

पुणे **बाबा आढाव**

## एक लेखक

ती हळूच आत आली
हिचं नाव आणीबाणी
मी ओळख करून दिली
आनंद झाला सगळ्यांना
इतका आनंद की ब्रह्मानंद !
या आनंद सागरात
एक लेखक बेहोश झाला
मेला नाही...
वारंच गेलं त्याच्या अंगातून
अगदी मुका झाला बिचारा
हात थरथरताहेत
बोलता तर येइचना
सारखा बरळतोय
विस वीस ऽऽ कलमी ऽऽ
कार्यक्रम ऽऽ

विटे **प्र. दि. शिराळकर**

## ‘आमच्यातला सूर्य हरवला’

आमच्यातला सूर्य हरवला
तेव्हापासून
वणवणतो आहोत
शोधण्यासाठी
एखादा अंधुक कवडसा
पण !
कोणा काळपुरुषास
पहावला नाही
आमचा
रक्तापि वर्ण
आणि मूत्रवलयात गुरफटून आम्ही
झालोत पुन्हा अंधार मार्गी
प्रगतीचा संभ्रमपथ
असो अंधार मार्ग
वा प्रकाश मार्ग
दोनही आहेत
मरणवाटा
निश्चितच !

बीड “ **अरुणाग्रज** ”

## मृत्युंजय

स्तब्ध इथे शब्द उभे
अनामिक एका भीतीचे
काळही आज उभा आहे
अशा वेगळ्या मार्गाने
शब्द जिथे फुलत होते
पाकळ्या तेथे पडल्या आहेत
स्वातंत्र्याचा आक्रोश करीत
सुगंधही सुटला आहे
शब्दावर फास पडला आहे
अनेक निष्पाप मरत आहे
शब्द तिथे लढतो आहे
जिथे ' मृत्युंजय ' उभा आहे

पुणे — श्याम सराफ

## आम्ही कोण ?

आम्ही कोण म्हणून काय पुसता ? आम्ही असू संजय
' राणीपुत्र ' आम्ही म्हणून तुमचे काही न वाटे भय
झालो पूर्ण कृतार्थ, जन्म मिळुनी त्या थोर नेहरू कुळी
' भावी पंतप्रधान ' मीच, अमुच्या दैवात आहे मुळी
केला त्याग कुणी प्रचंड, अमुच्या तीन्ही पिढ्यांनी जसा
आई पंतप्रधान, थोर महिला लाभे तिचा वारसा
केले काय अम्ही म्हणून पुसता, आईस माझ्या पुसा
तोंडे बंद करा त्वरे, नच तरी दावीन तुम्हा ' मिसा '

## मृत्युंजय

स्तब्ध इथे शब्द उभे
अनामिक एका भीतीचे
काळही आज उभा आहे
अशा वेगळ्या मार्गाने
शब्द जिथे फुलत होते
पाकळ्या तेथे पडल्या आहेत
स्वातंत्र्याचा आक्रोश करीत
सुगंधही सुटला आहे
शब्दावर फास पडला आहे
अनेक निष्पाप मरत आहे
शब्द तिथे लढतो आहे
जिथे ' मृत्युंजय ' उभा आहे

पुणे — **श्याम सराफ**

## आम्ही कोण ?

आम्ही कोण म्हणून काय पुसता ? आम्ही असू संजय
' राणीपुत्र ' आम्ही म्हणून तुमचे काही न वाटे भय
झालो पूर्ण कृतार्थ, जन्म मिळुनी त्या थोर नेहरू कुळी
' भावी पंतप्रधान ' मीच, अमुच्या दैवात आहे मुळी
केला त्याग कुणी प्रचंड, अमुच्या तीन्ही पिढ्यांनी जसा
आई पंतप्रधान, थोर महिला लाभे तिचा वारसा
केले काय अम्ही म्हणून पुसता, आईस माझ्या पुसा
तोंडे बंद करा त्वरे, नच तरी दावीन तुम्हा ' मिसा '

माताजी अमुची तसेच अमुचे मंत्री उभे पाठीशी
आम्हाला अडवील कोण ? तुमची फोडीन मी बत्तिशी
पैसा, तस्कर, गुंड, शासन असे सेवेत रात्रंदिन
पैसे देऊन लोक नित्य जमवू ऐकावया भाषण
अठरा कोटि दिले मला मिळवुनी मारूती मोटारिने
पैशाचा खजिना खुला मजपुढे नाही कशाला उणे
मोटारी उडवू खुशाल गगनी हिंडू विमानातुनी
मंत्री घेऊन हार गुच्छ, अमुच्या ये स्वागता धावुनी
चैनीचे सगळे विलास करतो मस्तीत ढंडारतो,
आणीबाणीत बेलगाम वदतो मंत्र्यासही दाटतो
नेते बंदिगृहात ठेवु सगळे बंदी करू भाषणा
टीकालेखन, वृत्तपत्रे सगळे बंदीत ही घोषणा
देशाची घटना जरूर बदलू आम्ही करू कायदे
कोणी त्यास विरोध व्यक्त करता गाडून टाकू तिथे
बेतो पाहून कोण 'पक्षजनता'? त्याला करू आडवे
त्यांनी पक्षरथास जुंपिली पहा ओढावया गाढवे
आम्हाला वगळा तुम्ही मग पहा, सांगेन मी कोण तो ?
येऊ द्या निवडून या क्षणी मला, रोके मला कोण तो ?
आम्ही कोण आता तुम्हास कळले ? ऐका पुन्हा सांगतो
आणीबाणित ' राजपुत्र ' म्हणुनी ऐश्वर्य मी भोगतो

पुणे **बाळ कोडितकर**

## बेंड

बेंड आले आहे – मानेवरती,
कुणी म्हणतात घामबेंड
कुणी गलंड, कुणी काही
नाना नावे – नाना मुखी

मी मात्र म्हणे
बेंड आले आहे मानेवरती,
बेंड म्हणजे आहे
--बंड !
कुणी म्हणतात क्रांती
कुणी ' उठाव ' कुणी इन्किलाब
नाना नावे नाना मुखी
मी मात्र जागवत आहे - जपत आहे
बेंड आले आहे मानेवरती !
कुणी म्हणे -
धीर धरा, कळा सोसा एकदम उद्रेक
होण्यासाठी परिपक्व होऊ द्या.
कुणी म्हणे,
त्यातील साऱ्या घाणीचा निचरा होऊ द्या
मग इलाज,
कुणी सांगे -
गंभीर दुखण्याला योजा, सारे अघोरीच उपाय
कुणी घावरून वदे,
प्रकृतिचा रोग प्रकृतीच समन्वय साधील !
मी मात्र निःश्वासाने म्हणे
साऱ्या शरीरभर, ठसठसणाऱ्या नसांची लय
नाडीचा ठोका चुकवत आहे.

प्रभाकर विश्वनाथ सातपुते

## जागा होशील का ?

समाजा, जागा होशील का ?
आणीबाणी सुरू जाहली, त्यात गड्या तू जागशिल का ?
अटल प्रकाशी हा नारायण
कारागारी जो रात्रंदिन
अस्तंगत तो तेथे व्हावा मनास तुझिया पटते का ?
मदांध सत्ता मत्त जाहली
न्याय देवता मरून गेली
घटनेच्या या कलेवराला तू संजीवन देशिल का ?
देशभक्ती हा द्रोहच ठरला
शिक्षा मिळते संन्याशाला
हो गंगेचे गटार जेथे स्नान तिथे तू करशिल का ?
होई जागृत आता सत्वर
वज्रमुठीने देरे टोकर
मस्तवाल हत्तीच्या माथी अंकुश आता धरशिल का ?

पुणे **सुधीर न. कुबेर**

## पिंजऱ्यातले पोपट

आम्ही आपणहून पिंजऱ्यात रहाणारे पोपट
आमच्या चोचींचा लालभडक रंग
आम्ही वाकवून ठेवलाय
आमच्या दिशेने.
डाळ लाटण्यासाठी
पाणी प्राशण्यासाठी

फळे कुरतडण्यासाठी
आम्हाला छान स्वागत करता येते
कुणाचेही...
अहो, घारे डोळे आमच्यावर खिळवून बसलेल्या
या मांजरीचेही !...
कित्ती प्रेमळ हे घारे डोळे !
आम्हाला निर्भय करणारे हे डोळे !!
डाळ खाण्यासाठी
पाणी पिण्यासाठी
फळे चाखण्यासाठी;
आता थोडी भीती वाटणारच मधून मधून, सवय होईतो
एक मात्र खरं.
ही वया पिंजऱ्याबाहेर पडूच देत नाही,
पण आता काय करणार ?
काल ती समोर नव्हती
जरा पंख हलवून पाहिले तर काय...
तेथेही डाळपाणीच फडफडले
फळांचे घोस गरगरले
फक्त गजांनाच लोंबकळता आले;
निमूट कबूल करतो :
आम्ही गेल्या कित्येक दिवसांत स्वतः उडालोच नाही !
...सवयच तुटली हो !!

—लक्ष्मीकांत प्रामाणिक

# त्या चित्राची मापं

तसं ते चित्र काढताना काहीच ठरवलं नव्हतं
माप वगैरे घ्यायचं
इंचभर इकडे तिकडे चाललं असतं.
असंच काढायचं, होतं ढोबळमानानं नुसतंच
रेघोट्या मारून आडव्यातिडव्या
खूप खूप समृद्धी दाखवायची होती चित्रभर
नांवही ठरलं होतं १९७६ चं चित्र.
पाव कागदभर वर काढलं छानसं
इकडे तिकडे एखादद्‌दुसरी गाडी पसरलेली अस्ताव्यस्त
दूरवर क्षितिजापल्याड छानपैकी समृद्धीची शेतं
पुढं एक मिल काढायला हवी होती, काढली
एक काटेरी वर्तुळही टाकून दिलं
मध्येच काहीसं प्रतीक म्हणून
एक माणूस काढायला घ्यायचा होता
येवढ्या निर्मितीच्या मागचा हात म्हणून तरी
तर—
जागाच नव्हती सेंटीमीटरभरसुद्धा
आता पट्ट्या लावून चित्र मोजतोय तीनतीनदा
स्केलचे गुणाकार-भागाकार करून झालेत
चूक कुठे झाली काही कळत नाही.

नासिक **विवेक गरुड**

# पाव शतक

त्यांचं एक टीक आहे
त्याला जाऊन पावशतक पूर्ण झाले
तू अजूनही
दातावर कणवेची नक्षी घेऊन
ओणवाच आहेस
तुटलेल्या एक चपलेच्या अंगठा सावरताना
पिशवीतून भेंडोळी सांडली तेव्हा
तुझ्या देवदासी छातीत हलले
तुझ्या दाराचे सनातन बेभरवशाचे छप्पर
आडजातीच्या लाकूड फळ्यांचे घरंदाज अस्तर
चिंध्या झालेले मन दाखवणारे भिंतीवर
पायपोस नसलेले पोस्टर
तूही त्याच्याच वयाचा की काय ?
तुलाही ऐकू येत नाही का खोल काळजातून
येणाऱ्या हाकेमागची परसातली माय
डोळे फोडून घेतलेल्या
दिसतो का तुला सदा विझलेला
तवा चुलीवरचा ?
जसा की सैन्यात सामील होणारा
तुझ्या क्रांतीची आयुधे
रस्त्यांवर कालच विरलेल्या घोषणा
हात कधीच परागंदा झालेल्या, थोठ्या
नेत्यांच्या वल्गना
याहून गर्दीत स्वतःचा होताना
आठवणींनी पिळवटणारी आतडी खांद्याखाली
आश्रयार्थी तोंडातून गळत असणारी

## पाव शतक

त्यांचं एक ठीक आहे
त्याला जाऊन पावशतक पूर्ण झाले
तू अजूनही
दातावर कणवेची नक्षी घेऊन
ओणवाच आहेस
तुटलेल्या एक चपलेचा अंगठा सावरताना
पिशवीतून भेंडोळी सांडली तेव्हा
तुझ्या देवदासी छातीत हलले
तुझ्या दाराचे सनातन बेभरवशाचे छप्पर
आडजातीच्या लाकूड फळ्यांचे घरंदाज अस्तर
चिंध्या झालेले मन दाखवणारे भिंतीवर
पायपोस नसलेले पोस्टर
तूही त्याच्याच वयाचा की काय ?
तुलाही ऐकू येत नाही का खोल काळजातून
येणाऱ्या हाकेमागची परसातली माय
डोळे फोडून घेतलेल्या
दिसतो का तुला सदा विझलेला
तवा चुलीवरचा ?
जसा की सैन्यात सामील होणारा
तुझ्या क्रांतीची आयुधे
रस्त्यांवर कालच विरलेल्या घोषणा
हात कधीच परागंदा झालेल्या, थोऱ्या
नेत्यांच्या वल्गना
याहून गर्दीत स्वतःचा होताना
आठवणींनी पिळवटणारी आतडी खांद्याखाली
आश्रयार्थी तोंडातून गळत असणारी

सनातन्य
भव्य
पण बोवडी
तुझ्या मरणाचा हिशेब करू नकोस
तुला जन्मापर्यंत मागे जावे लागेल
अरे, आता तरी तू ही दारे तोड, प्रकाश
येईल—न येईल
तू आधी हा अंधार फोड
आणि हे सारे
तुझ्या वयाला, त्याचे अन्न, भ्रान्त निर्णय
कडकडून डसण्याआधी

**वा. रा. सोनार**

## ‘ निशाणी ’

आणखी एक जराजर्जर नेता
आपल्याच सुळापुढे उभा राहिला
तेव्हा
हजारो कोसळलेल्या आंदोलनांचे
छिन्नविच्छिन्न साम्राज्य
पुन्हा एकदा हलले.
शब्दांच्या जंजाळातून
विकासवाटा आखण्याची त्याची धडपड
माध्यान्हीच्या सूर्याइतकीच
निष्कलंक प्रभा
सम्राटांचे विजयरथ रोखणारे
त्याचे धगधगते शब्द

सारे कोसळून पडतात
कपाळी लावलेल्या वेडीसकट
त्या अस्थिहीन प्रजेच्या पायी
अपार दारिद्र्याची निशाणी मिरवत.

इचलकरंजी — संजय मिराशी

## मूग घ्या मूग

मूग घ्या मूग ! मूग घ्या मूग ! !
काय म्हणता ? भाव काय ?
काय बाई, कसले काय !
वाटेल तो द्या दाम मुगाचेच आज काम !
हवं तर फुकट घ्या पण मूग घ्या मूग !
पलीकडच्या गल्लीतले ज्वलज्जहाल नेते
अलीकडच्या ओळीतले महनीय प्रवक्ते
जवाहरलाल पथावरील पुरोगामी साहित्यकार
नव्या टिळक कॉलनीतले झुंजार पत्रकार
आगरकर वसाहतीतले जागृत विचारवंत
सांस्कृतिक नगरातले क्रांतिकारी कलावंत
किती तरी लोकश्री कितीतरी वीरश्री
किती तरी सुरश्री एक दोन म्हणू नका,
किती तरी पद्मश्री...
शास्त्री, पंडित, तीर्थ, मीमांसक...
अध्यापक–प्राध्यापक
आचार्य–प्राचार्य, भूषण–विभूषण
सगळ्यांनी बाईसाहेब
मूग घेतले भरभर, किती किती झरझर !

भावाची चर्चा नाही, मापाची पर्वा नाही
वासाचीस...विचारपूस...काही म्हणजे काही नाही !
खरोखर ! बाईसाहेब, विद्वान शहाण्यांचे कामच न्यारे
लगोलग जाणतात मतलबी वारे !
मूग घेतले पटपट, गिळून बसले झटपट !
मूग घ्या मूग ! मूग घ्या मूग ! !

पुणे —राजा मंगळवेढेकर

## आम्हाला निवडून द्या

झाले गेले विसरून जा ।
पण आम्हाला निवडून द्या ।
भूल चूक होणार नाही-हुकूमशाही संपणार नाही ।
जास्त काही करणार नाही–विष देऊ पण मारणार नाही ॥
झाले गेले विसरून जा ।
पण आम्हाला निवडून द्या ॥
'आणी' ठेवू 'वाणि' मोडू–काही सोडले काही सोडू ।
महागाईचे 'नाव' खोडू–'स्वस्त धान्य' अफवा जोडू ॥
झाले गेले विसरून जा ।
पण आम्हाला निवडून द्या ॥
गोळीबारी झाली नाही–मुंगी सुद्धा मेली नाही ।
सत्ता मात्र गेली नाही–काही गडबड केली नाही ॥
झाले गेले विसरून जा ।
पण आम्हाला निवडून द्या ॥
सक्ती नाही शक्ती ठेवू–सारं काही नंतर घेऊ ।
गरिबांना तुरी-देऊ–तूपपोळी आम्ही जेवू ॥
झाले गेले विसरून जा ।
पण आम्हाला निवडून द्या ॥ एम. क्यू. हमसाई

## मुक्त

पिंजरा तोडून
मुक्त झालेला तो पक्षी
जखमी पंखातील रक्ताने
हिरव्या भूमीवर
लाल नागमोडी उमटवीत
उडतो आहे
आपल्या घरट्याकडे
कदाचित—
आपल्या मृत्यूकडे
पण—
त्याच्याकडे करुणेने पाहणारे
सारे आकाशही
हिरावून घेऊ शकत नाही
रक्तात माखलेला
त्याचा आनंद...अभिमान
पिंजरा तोडल्याचा

नासिक — कुसुमाग्रज

## सुटकेचा संकेत घेऊन सकाळ उजाडते

सुटकेचा संकेत घेऊन सकाळ उजाडते
उद्याची आशा लावून रात्र झोपवते
रोज आपला तोच खेळ
पाहता पाहता जातो वेळ
आणीबाणी आणि मिसा
जीव होतो कसनुसा

च्यायला काय ही आणीबाणी
डोळ्यांमध्ये दाटते पाणी
पोरे-लेकरे-राजकारण
डोक्यामध्ये चालते दळण
पिसा वेड्यांनो चक्की पिसा
बाईनं लावलाय तुम्हाला मिसा
आणीबाणी आणि मिसा
वाढलेली दाढी, कुरतडलेल्या मिशा
जप-अनुष्ठान-पूजा अर्चा
असे सर्व चालू आहे
डोके मात्र गहाण आहे
अधून मधून भलतेच तडकते
खवले मांजर उगाच फिस्कारते
'शुक शुक' अरे वेड्या असं वागायचं नसतं
भविष्य उद्याचं पाहायचं असतं
८ ऑक्टो—२५ ऑक्टो--
१४ नोव्हें—१७ नोव्हें—
पंचाग तसे आहे पाठ
महादेवाच्या पिंडीवर गळतीचा माठ
पॅरोलची गळती—थेंब थेंब सुटका
भलताच वैताग मोजाव्या घटका
च्यायला तरी मी सांगत होतो—
एकला जीव असा तडफडतो
दुपारचं तसं बरंच उकडतं
डब्याचं झाकण हळूच उघडतं
सुटकेचा संकेत घेऊन सकाळ उजाडते
उद्याची आशा लावून रात्र झोपवते

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२०८ ग्रं. क्र. ...१५.१०.७९
२१५९३
ग्रंथ, शाखा (स्थळ प्रत)

पुणे बाबा आढाव

## पोपट

पिंजऱ्यामधला पोपट माझा
गोडगोड बोलत असतो
रेडिओच्या तालावरती
दिवसभर डोलत असतो
आवाज त्याचा सुरेल इतका
रेडिओही त्यापुढे फिका
स्तुती अशी करेल छान,
मोठमोठ्या भाटांचीही
आपोआप खाली मान !
पोपट माझा खूप गुणी
द्याल तेवढेच पेरू आणि
द्याल तेवढेच पितो पाणी
पिंजऱ्यामध्ये राहून देखिल
शिकवाल तशी गातो गाणी—
स्फूर्तीची, शिस्तीची
प्रीतीची, प्रगतीची
आनंदाची, समृद्धीची
हवी तशी तुम्हांला
गातो ही गोड गीते—
हव्या तशा अर्थाची
अधुनमधुन सुभाषिते !
पोपट माझा काय करतो
भल्या पहाटे उठून बसतो
डिट्टो रेडिओच्या आवाजात
भूपाळ्या अन् गात असतो
खिन्न रात्र काळोखाची

संपोनिया गेली
नवचैतन्याचा पसारा
फुलवीत पहाट आली
तंद्रीत आपल्या असेच काही
खुशीखुशीत गात राही
पिंजऱ्यातला हा पोपट माझा
परवा खूप खुशीत होता
गोडीगोडीत मला काही
गूज हळू सांगत होता
मोकळया त्या हवेपेक्षा
पिंजराच छान वाटू लागला
पिंजऱ्यामुळेच माझ्यामध्ये
कितीतरी बदल झाला
नाहीतर बाहेर सांगा !
एवढ्याशा पेरू अन् पाण्यासाठी
किती मरमर मला
करावी लागत होती !
सोनेरी या पिंजऱ्यामुळे
सोनेरी हे दिवस आले !
पिंजऱ्यातला हा पोपट माझा
असे काही सुंदर बोलला—
रेडिओसाठी टेप करायला हवे होते
विचार एक येऊन गेला !

औरंगाबाद

**—सुहास जेवळीकर**

## एक कविता

अपेक्षा होती
क्षितिज भेदून जाणाऱ्या नजरेची
तेव्हा नेत्याचे डोळे
खलबतखान्यात बंद होते
मुर्दाड मुस्कटदाबीने
खुरटलेल्या दिशा
क्षितिजाकडे धावल्या
तेव्हा अपेक्षा होती
आणखी एका संगराची विननेत्याच्या
रस्त्यानेच नेतृत्व पत्करले
तेव्हा मात्र—
सशांचे वाघ झाले
हातांचे बाहू झाले
गर्जनांचे घोष झाले
अथांग गर्दीवर गाजत.

इचलकरंजी

—संजय मिराशी

## वडील सांगत होते

वडील सांगतच होते
वडील सांगत राहिले
.............मी
मी रात्र पाहिली होती
त्या तिथे, काळोखी, चंद्र नव्हताच
दिवसदेखील नव्हता, पण...

कोणी कोणी म्हणत चालले होते ' आज
हिंदोस्तान स्वयं वा है '
मलाही त्या काळोखात
दुधाळ स्वातंत्र्यदेवी दिसत होती, त्या तिथं—
क्षितिजावर, ज्या ठिकाणी ती हात फैलावून
आम्हांला बोलावीत होती, म्हणत होती
' जल्लोष करा, चाखा आनंद आता तरी
मी तुमचीच आहे, हात रंगवा, ते
वेड्यांसाठी नाहीत ' वगैरे वगैरे
मला ती अजूनही तिथेच दिसते आहे
उंबरठ्यावर का येत नाही ते ?...
वडील थकलेत,
त्या क्षितिजावर मी सुद्धा पाह्यलं
होतंच कोण तिथं ? रात्र चंदाळ होती, पण...
पंध्रा ऑगस्टची नव्हे
मला कसं सगळं स्पष्ट दिसतं होतं—इथं
अगदी लीनतेने गळे दावले जाणार होते...जाणार आहेत
( खूप करण्याचे मंत्र देऊन, कदाचित
अनेक कलमी, आश्वासनी उद्घोषात
त्याचवेळी बुद्धिमंतांना अलद दूर सारीत...)
कसा योगायोग असतो पाहा तरी !
माणसाचा हात पंजादीन होता, जुगार असत्य
यांच्या सहवासात, खोट्या इतिहास साक्षींचे
पुरावे कालकुपीत राखून ठेवत, आकाशीचे अश्रू
ढासळणाऱ्यांच्या कोरीव प्रतिमा पहात, स्वतःचे
रक्ताळलेले हात, ते खुंटेच...
पळत होता पोटाची करंजी घेउन ' कडून–कडेच '
( हि ' कडे ' ' कडून ' ) ते हिम धूसर होतं

*

ती अमावास्येची काळोखी होती
आता सगळे दिवस रानकोळी खात आहेत
हा योगायोग नाही बरे! इथं
भीतीचे साम्राज्य अन् मान उंच
ठेवण्याची करबुडव्यांची हुकमी धडपड ( हे करम
जग पहाणारच्च करतो... )
सज्जन बुद्धिमंत म्हणून आत्महत्या करतात, कारण
त्यांचा स्वतःवरचा विश्वास उडालेला असतो.
( जीवनाचे भीतिशून्य आदर्श पाळले जाताहेत
त्यामुळे राष्ट्रीय संपत्ती वाढते आहे...)
म्हणून माणसांचे रक्त शहीद नाहीये
एवंच तिला पाहणारे आहेत, पण आवाक्यात नाहीये
सभोवताली सगळे आयुक्त, एकेक वटहुकुमावर पदस्थ
मनाचे
शरीराचे
स्वतःचे
स्वतःच्या भीतीचे
तरीही टिकण्यासाठी घेतलेल्या स्वातंत्र्याचे वज्र...
" स्वातंत्र्यदेवी " वडील म्हणत होते तिथं नाहीयच
' यू स्टूपीड डोन्ट लूक ' कारण ती
कधीच परतली आहे...'

**सु. म. तडकोडकर**

## विद्यापीठ

भलत्या विद्यापीठामध्ये शिरलो आणि फसलो
भल्या भल्या गुरूंकडून भलतेच शिकून बसलो.

टिळक सर स्वराज्याचा अर्थ चुकले होते
म्हणे जन्मसिद्ध हक्क ! विचार किती कोते !
मोहनदास मास्तरांचा दोष सांगू कोणा ?
भारवाहू पाटीचाही ताट करीत कुणा !
पंडितजींची भाषा सुंदर इतिहासाची रड
स्पेनसाठी, चीनसाठी उगा काढीत कढ
बोस मोशाय भलते कडक ! त्यांचा एक धोशा
हवी असेल आजादी तर रक्त द्या ही भाषा !
एकापेक्षा एकेक गुल ! आत्म्यावर ती भिस्त
एकानेही लावली नाही चिडीचूप शिस्त !
कुणी शिकवलेच नाही, बंद करा डोळे,
तोंडामध्ये लगाम घाला, कानामध्ये बोळे
आता प्रसंग आल्यावरती मला पटले आहे
शिक्षण आणि जीवन यांचे नाते तुटले आहे
मुंबई **प्रा. वसंत बापट**

## एक पहाटच अशी उजाडली

एक पहाटच अशी उजाडली
ज्या दिवशी सूर्य उगवलाच नाही
क्षितिजावर उगवली एक दुष्ट शक्ती
मुठीत आपल्या अंधकार घेऊन
त्या दिवशी पाखरांनी किलबिल केलीच नाही
रातकिड्यांचं कर्कश ओरडणं थांबलंच नाही
कळ्यांची फुलं कुठे उमललीच नाही
शीतल वारा पहाटफेरीस निघालाही नाही.
त्या दिवशी मला कळलं
माझा मीच एकटा आहे
भुतेच सगळी नाचताहेत

मला आपल्यात बोलावताहेत
आमच्या देवतेने अभयदान दिलं आहे
म्हणून मुखवटा काढून फेकला आहे
कालपर्यंत मुखवट्याचे बंदिवान होतो
आज आम्ही खरे खरे आझाद आहोत
आमची देवता शितं सारखी फेकत रहाते
आम्ही सारे धुंद होऊन नाचत रहातो
अरे, जीवन जीवन म्हणजे काय ?
शितासाठी पोटासाठी नाचा ! दुसरे काय ?
चल ये. आमच्यात मिळून एक हो
ताल धरून नाचायला लाग. देवतेला प्रसन्न कर
तुलाही ती शीत देईल. प्रेमाने जवळ करील
हे युग तिचं आहे. ती आपला म्हणेल त्याचं आहे.
तशी मी पाठ फिरविली
सुसाट क्षितिजाकडे धावत सुटलो
म्हटलं क्षितिजाचं झाकण वर उचलावं
सूर्याला आवर्जून आत बोलवावं
तशी वाट अडवली एका म्हातारीने
कोंबडं झाकून त्यावर बसलेल्या अवदसेने
म्हणाली कुठे निघालास ? सूर्याला बोलवायला ?
वेड्या जगाला शितं हवीत. सूर्य नको आहे !
तिच्याकडे पाठ फिरवून एकदम मी पळू लागलो
पण तिचेही हात लांब होते. पुन्हा तिच्या हाती पडलो
म्हणाली, खबरदार सूर्याकडे धावलास तर
पुन्हा त्याला आणलास तर !
सूर्याला मी अशीच दाबून धरणार
क्षितिज माझं, त्यावर मीच उगवणार !

नागपूर

**वसंत वरखेडकर**

# राजपथ

राजपथावरून आस्ते आस्ते
रथ सरकतोय दिमाखात पुढे।
सारख्याच गणवेशातील रक्षकांनी
केले आहे भोवती कडे।
पुढे झुलताहेत स्थूल हत्ती
मढविलेले दागिन्यांनी।
फेटेवाले सैनिक बसलेत
घोड्यावर मोठ्या ऐटीने।
सोहळा आहे सम्राटाचा
आनंदी वाढदिवसाचा।
जल्लोष चाललाय चोहिकडे
त्याच्याच जयजयकाराचा
उंचउंच हवेल्यांतून
प्रजा पहातेय नेत्रभराने।
वैभव पाहून युवराजाचे
खाली मान घातलीय इंद्राने।
तिकडे दूर पलीकडे
कोणी थेरडा एक मेलाय।
चौघांच्या खांद्यावरून
नेमकाच आडवा आलाय।
मंगलदायी प्रसंगाला
अशुभच नव्हे का ते।
हाच मुहूर्त साधायला
त्याला का समजत नव्हते।
धावत जाऊन रक्षकांनी
हटकले त्यांना तिथेच।

पिटाळून लावले चौघांना
बोळातून तेथल्या तिथेच।
राजद्रोहीच नाही का तो
विचार आला मनात।
गेलो त्यांच्या मागाहून
एकदम थेट स्मशानात।
संपला जेव्हा कारभार त्यांचा
निघालो घरी येण्यास।
गाठून मुलाला म्हाताऱ्याच्या
विचारला त्याचा इतिहास।
केले होते काम म्हाताऱ्याने
'राजपथाच्या' बांधणीचे।
देवाघरी जातानाही त्याला
रोखले होते त्यावरून जाण्याचे।

वालचंदनगर **वि. ना. शहा**

## कत्तलखाने

उगवत्या सूर्याला नमस्कारणाऱ्या
या देशातील लोकांनी
सूर्यच झाकू पाहिला—
पालखीच्या दांड्या मोडून
छप्पराची सोय वाहाणाऱ्यांच्या
दिंड्या वेशीतच घुमल्या—!

* *

या गावात स्वप्नं छाटली जातात
अभोगी गर्भ पाडावा तशी—

उत्सुकहो—डोण्ट वरी !
गुप्ततेची हमी आहे.

* *

तुमच्या दानाने नादान झालेला मी
कातड्याचं सोंग घेऊन
आतड्याची वतावणी करताच येत नाही
दोस्त हो—पिंजून झालेलं आख्खं आयुष्य
तुमच्या राजगाद्यांसाठी तयार आहे—!

* *

मावळतीचे उदास उत्सव
पानापानांतून दाटलेत
निवरत्या देठांनी
डहुळत्या फांदीला एकदाच निरोपिले
आकांताचा कविला : आपल्याच रक्ताचा

* *

सवालांची जीभ छाटताना
जिंदगीला खूप जवळून पाहिले
न्याहाळता आले तेवढे न्याहाळून घेतले
कुर्निसाताची लय : सम साधून झेलली
: गेलेल्यांच्या फाल्या पढताना
कब्रि कब्रीला डोळा घालून
क्षितिजभर झाला माझ्यातील नागवा—!

* *

हंगामाच्या खळ्यावर डाहोरा शिजताना
अजून हलतेय टांगल्या बकऱ्याची सागुती
जाता जाता तुला म्हणता आली तर
म्हण एक सायंप्रार्थना :
|| आभाळातील बापाला शांती लाभो ||

|| त्यांचे वाडे भरभराटीला येवोत ||
|| त्यांच्या शेत–शिवाराला गाभ राहो ||
|| त्यांच्या बोरी-जांभळीला डोहाळे लागोत ||
|| त्यांच्या पोरी उदंड औक्षवंत होवोत ||
|| त्यांच्या गोळ्या दिशा दिशा सणाणोत ||
|| त्यांचे कत्तलखाने चिरायु होवोत ||

**विजय ग. वाकडे**

## आणीबाणी

एक काळ असा येतो, तुमचे अस्तित्वच अमान्य करतो
आणि राखरांगोळी करतो, तुमच्या स्वप्नस्वातंत्र्याची.
एक काळ असा येतो, तुम्ही वीर्यहीन, संवेदनाहीन बनता
आणि अभिमान बाळगता पंढांचा आणि लाचारांचा
एक काळ असा येतो, अकर्तृत्वालाच मोठेपण प्राप्त होते,
आणि सत्तामदांधांनाच रक्षणकर्ते म्हटले जाते लोकशाहीचे
मित्रांनो, उठा आणि व्हा सिद्ध खांदा देण्यास तिरड्यांना,
तुरुंगात खितपत पडलेल्या तुमच्या वडिलांच्या, भावांच्या
आणि सहचऱ्यांच्या
भारतीयांनो विसरून जा तुमचे हक्क आणि अधिकार,
एक लोकशाही राष्ट्राचे नागरिक म्हणून;
आणि करा सलाम भारताच्या या अनभिषिक्त सम्राज्ञीस
गरिबांनो, झाकून टाका तुमची ही नंगी शरीरे आणि
खपाटीला गेलेली पोटे
मुकाट स्वीकारा ही हिरवी नोट आणि प्रेमाने दिलेली
लुगडी आणि धोतरे.
आणि द्या मत या प्रियदर्शिनीस
आणि 'ब्र' काढू नका यापुढील सहा वर्षे.
पुणे

**विद्याधर इनामदार**

## लाचारांचे गूढ

वाट चुकलेल्या देशभक्तांचे आदर्शही चुकीचे,
राणा प्रताप हवा कशाला ?...नेतेच आमचे पहायचे !
संसारात गुरफटलेले कृतिशून्य वाचाळ आम्ही
आम्हा पाहून कुत्सितपणे कोणी म्हणतात लाचार तुम्ही !
लाचारी का दोष आहे ? वैभवाची वाट ही !
पैसा आणि प्रतिष्ठा यांची पक्की गाठ ही !!
लाचारी हे दूषण नव्हे लाचारी हे भूषण आहे
सहजसुलभ वैभवाचे सरळ असे सूत्र आहे
संधिसाधू लाचार सारे झाले वडे वडे नेते
पहा आजच्या दुनियेत असेच कुठेही दिसते !
स्वाभिमान काय देतो ? धर्मनिष्ठा काय देते ?
देशभक्ती करणाऱ्यांच्या हाती सदा झोळी येते !
न्याय, नीती, सदाचार या तर शुद्ध थापा आहेत
भाषणबाजीत चिवडायाच्या लंब्याचवड्या गप्पा आहेत
मोडेन पण वाकणार नाही ब्रीद हे खरे नव्हे
'ॲडजस्टमेंट'चे दिवस आहेत हे काही खोटे नव्हे
निष्ठेपायी राणा प्रताप रानोमाळ भटकले
पोरेवाले भुकी ठेवून दारिद्र्यात बुडाले
इमान हा गुण नव्हे, स्वार्थ हा दोष नव्हे
व्यवहारी नियम हे त्यांना पर्याय असू नये
चेतक एक घोडा होता त्याला जरी कळले नाही,
राणा प्रताप माणूस असून त्याला कसे वळले नाही ?
हे एक सत्य आहे, त्याचे कोणी नाव काढतात
चारशे वर्षे जाऊनसुद्धा हळदीघाट आठवतात
कोण बरोबर तो की आम्ही ? याचे उत्तर कोण देणार ?
आमच्या सारख्या लाचारांचे गूढ कोण उकलणार ?

**लाचार**

## आजचे महाभारत

कालचक्र हाती घेऊन
अवतरणार एक चक्रधर
नियतीची वासरी वनवून
तोच होणार बन्सीधर
कलियुगाच्या सभेमध्ये
सत्याला फेडलं जातंय
सत्तेचा राधासुत येथे
असत्याचा द्यूत खेळतोय
सत्य सेवकांना या द्यूतात
जावं लागलंय वनवासात
हा वनवास आता निश्चितच संपणाराय
राधासुताचं चाक कलियुगात घुसणाराय
धर्मराज एकटा राहून तो
सत्य संघटन करणाराय
ह्या युद्धात धर्मराज
निश्चितच जिंकणाराय

**संजय गोळे**

## पंचवीस जून पंचाहत्तरची कविता

अस्तित्वाच्या अंतिम दिवशी
वेड्या घातलेल्या सूर्याने प्रश्न केला होता
हे काय आहे ?
अथांग पसरलेल्या सागरानं उत्तर दिलं नाही
अनंत व्यापलेल्या आभाळानं उत्तर दिलं नाही

अस्तित्वाच्या अंतिम दिवशी
वेड्या घातलेल्या सूर्याने प्रश्न केला होता
हे काय आहे ?
इवल्याशा ठिणगीनं उत्तर दिलं
चिमण्याशा विश्वासानं उत्तर दिलं
लक्ष लक्ष गर्भांवर लक्ष लक्ष आघात
पण त्यांनी कधीच होत नाही गर्भपात '
आणि
अस्तित्वाच्या अंतिम दिवशी वेड्या घातलेल्या सूर्यानं
फक्त स्मित केलं.

**महेन्द्र कानिटकर**

## स्थानबद्धाची मी पत्नी बोलते आहे

' सीमांत पूजनाचे वेळीच समजून चुकले मी
जलवेदी पूजन हेच अखेर
आयुष्य समिधेची माला गुंफून जेव्हा त्यांच्या गळयात घातली.
तेव्हाच संकटकारिणी स्वतःच्या गळयात अडकवली
उंबरठ्यावरचे माप ओलांडून सौ. म्हणून गृहप्रवेश केला आणि
वेळीच समजले एका स्थानबद्धाला
पहिल्या डोहाळजेवणाचा माझा फोटो पहा अजून कसा—
प्राजक्ताच्या फुलांसारखा टवटवीत दिसतो आहे ! पण आज
लंकेच्या पार्वतीसारखी मी आक्रंदते आहे—
आमचे संसार उद्ध्वस्त करणाऱ्या मुर्दाडांनो
स्थानबद्धांना नसतातच का गोजिरवाणी मुले–? की,
नसतात बायका त्यांना चारचौघींसारख्या ?
स्वतःच्या संसारात रममाण होता ना, हे विचार—

आलेच नाहीत का कधी ?
तर मग खरेच का तुम्ही माणसे आहात !
वैचारिक गुलामगिरीच्या शिलेदारांनो
काळया दगडावर ठेवा लिहून स्थानबद्धाची मी पत्नी
बोलते आहे---
बाप स्थानबद्ध झाला तेव्हा मुलगा स्थानबद्धच होता एकप्रकारे
जन्मठेपीच्या नऊ महिन्यानंतर मुलगा बाहेर पाहतो तर बाप मात्र आतच—
विचार करायलाच नको–स्थानबद्धाचाच तो मुलगा आहे म्हणावं–बापाच्या सुटकेकरिता, आयुष्य वेचणार श्वासागणिक आपले–राखेतूनसुद्धा उफाळतील तेव्हा–स्फुल्लिंग
स्थानबद्ध म्हणूनच

मुंबई **मच्छिंद्रनाथ तुकाराम वारेकर**

## एक कविता

पारव्याला पिंजऱ्यात कोंडले आहे
त्याने मुक्त आकाशात
विहरण्याचा गुन्हा केला म्हणून
रक्ताला चटावलेल्या
सैतानाला
स्वातंत्र्याची चीड आहे
गिधाडांच्या स्वैराचाराला
ऊत आला आहे
शार्दुलास बंदी करून
श्रृगालाने
अस्वलाचा पाश पसरला आहे
स्वार्थांधाला

मानवतेचा सूर्य
दिसावा तरी कसा ?
पिंजऱ्यात पारवा
पंख फडफडवीत आहे
आणि त्याच्यासाठी
पिंजऱ्यात
आकाशच अवतीर्ण झाले आहे.

गोवा

**दत्ता वी. नाईक**

## मुकी बिचारी मेंढरासारखी

गावाबाहेरच्या आपल्या वस्तीकडे तो किती तरी वेळ
पहातच राहिला होता. त्याच्या विशाल करारी
डोळ्यांत त्या दरिद्री वेदना काळीज पोखरीत निघाल्या.
तो युगपुरुष हजारोंच्या जमावात डरकाळ्या
फोडणारा सिंह एका काळोख्या रात्री तक्यामध्ये
बसून तो एकटाच ढसाढसा रडू लागला
ती वेदना घेऊनच तो जगू लागला, डोंगराएवढी
विशाल संकटे उभी राहिली. त्याच्यापुढे तेव्हा
डोंगरसुद्धा खुजे–खुजे वाटू लागले
पुढे त्याला अनेक सन्मानाची निमंत्रणे आली
नाही असे नाही. तो पाठमोरा उभा राहिला
तळागाळातली माणसे त्याला आठवत होती. त्याने
त्याच्यासाठी सगळीच किताबं नाकारली
त्याने आपल्या दरिद्री झोपड्या-झोपड्यांत दिवे
लावले. आईची माया देऊन सर्वांनाच त्याने
उराशी घेतले. त्यांच्यासाठी त्याने भल्याभल्यांशी

दोन हातही केले.
त्याची रक्षा नदीत विखरून परतताना त्याचे मानस
पुत्र दाही दिशानी पसार झाले. त्याच्या नावावरती
सगळयांनीच आपापल्या घरी दुकाने उघडली
मुकी विचारी पुढे मेंढरासारखी कळप करून
राहिली. जिकडे चारा दिसेल तिकडे चौखूर निघाली

इरगोंडा पाटील

## बा स्वातंत्र्या !

अजून सगळेच सांगतात याच ठिकाणी
एक म्हातारी झोपडी आपले कुबड काढून
रातदिस उनपाऊस खात होती
या म्हाताऱ्या झोपडीत चार कच्च्या-बच्च्या
मुलांची एक माय रात दिस काम करत
आपल्या पोटच्या गोळयांना जगवीत होती
आज तिथे झोपडी नाही, चार कच्च्या बच्च्या
मुलांची मायसुद्धा नाही, त्यांचे पुढे काय
झाले याचे उत्तर कोणी कोणाला देत नाही
सगळेच म्हणतात, आम्हीही म्हणतो छान ! छान !
बा स्वातंत्र्या ! रक्त कोणी सांडले, कोण मिरवतोय—
उमाळून येते माफ करा हे कोठे बोलणार नाही
चार भिंतींच्या आत जरी बोलाल तरी खबरदार !
जीभ कापली जाईल; हात कलम केले जातील
बा स्वातंत्र्या ! त्यांना कोणीच विचारणार नाही

पुणे

इरगोंडा पाटील

## आज तो कोठे आहे ?

जेव्हा पंचा नेसलेल्या म्हाताऱ्याने एकच हाक
दिली ना, तेव्हाच त्याने आपल्या भरल्या
घराला नाकारले, आपल्यावर तुळशीपत्र ठेवून
मूठभर मीठ उचलण्यासाठी तो एका दमातच
पन्नास मैल चालून गेला
स्वातंत्र्याची मशाल हातात घेऊनच तो सदा
हिंडायचा. स्वातंत्र्याचा सूर्य खेचून आणण्यासाठी
तो सर्वांच्या पुढे धावला. त्याने एकदा बुरुजा—
वरून उडी टाकली. नदीपार करताना त्याच्या
शरीरातून गोळी आरपार गेली. तो पुढेच धावला
स्वातंत्र्याचा सूर्य त्याने पाहिला, भूपुत्रासाठी
त्याने कर्ममंदिरे उभारली तेव्हा त्याला काळवंडण्या-
साठी अतिरथी सरसावले. कधी मधी त्याला
सिंहासनावरतीही बसविले तिथून. तो माघार
फिरला. अगदी बुद्धा सारखा
आज सिंहासने भरताना तो तिकडे फिरकला
नाही. उगवत्या सूर्याला नमस्कार करणे त्याला
कधी जमले नाही. सगळ्यांनीच तिथे
विचारले आज तो कोठे आहे ?

**इरगोंडा पाटील**

## डाव

आम्ही राजे होतो
राण्या होतो

पण खेळातल्या
गुलाम होतो दुसऱ्याचे
एक्के होतो पण
बिन हुकमाचे
नुसती शोभेची दिखाऊ
चित्रं रंगीबेरंगी
अन् निरुपयोगी
कधी कधी
पाने येऊनही
डाव रंगत नाही
कारण आम्ही
दुसऱ्यांच्या मर्जीने
खेळवली जाणारी
डाव हरणारी पानं

**प्रकाश अत्रे**

## रक्त

रक्त...फार लाल असतं
क्रांतीला आव्हान देतं.
रक्त...फार सळसळतं,
नसानसांतून फिरतं.
रक्त...सांडतं वेशीवर अन्यायासाठी,
त्याचा थेंब न् थेंब लाल दिसतो
रक्त...फार उष्ण असतं, जागृतीला चेतना देतं
रक्त...फार चांगलं असतं,
मरणाऱ्याला वाचवतं.

पण ! रक्त...कधी कधी फार थंड असतं,
आपलं जिथं नातं असतं,
आपले दोष मूग गिळून बसतं,
दुसऱ्याच्या दोषाला तोंड नसतं.
तसंच रक्त...कधीकधी आपलंच असतं,
दुत्कारुन उठतं, क्षणात अंगावर येतं
नसानसांतील रक्त जागे होण्याआधीच
आपणालाच रक्तबंबाळ करतं !!
रक्तबंबाळ करतं !!

मिरज —अरुण गुमास्ते

## जगू द्या शब्दांना तरी

आजवर राहिलेल्या टवटवीत
निर्माल्यं होताहेत शब्दांची आता
आम्हीही थकलोय
जीवघेणी आश्वासनं ऐकता ऐकता
ठेवा तो मुकुट !
राजदंडही इथंच राहू द्या !
पेलवणार नाही हातांना...
मस्तकाला !
मरून जाऊ
गुदमरून त्याखाली
सहन करु तेही
पण महाराज—
मूल्याने स्वतःच्या
जगू द्या शब्दांना तरी !

कोल्हापूर —मोहन जोशी

## सत्य आणि गोळी

या देशाची रीत वेगळी
सत्य बोलाल तर खाल गोळी
        तोंडावरती चिकटवून पट्टी
        गुदमरून गुदमरून शेवटी
        प्राण जाती डोळ्यांतून वरती
जीवन जगणे जीव आहे म्हणून
खायचे फटके धड आहे म्हणून
जळजळ मनात साठवून केवळ
        शिळे तुकडे चघळत बसणे
        कुत्र्यालाही असले जीवन असते
        मानव, पशु फरक हा केवळ

पूर्णा, परभणी
(तुषार) अनिल कोकीळ

## वाळीत

खवळलेल्या सागराप्रमाणे
तू हसला पाहिजेस
कुणाची गय न करता ज्वालामुखी सारखा
आगीचा डोंब उठावा
तुझ्या मस्तकातून
अणूप्रमाणे उद्रेक व्हावा
तुझ्या बाहूंतून
मदिरेने मस्त झालेल्या
हत्तीप्रमाणे धडका दे तू
तुला चांडाळ केलेल्यांना
तरच तुझ्यातला माणूस

'माणूस' जागा रहाणार आहे
नाहीतर पुन्हा तू
टाकला जाशील 'वाळीत'

माढा (सोलापूर) —कल्याण. बी. लंकेश्वर

## 'पोटुशी'

'इंडिया' जिसका नाम है
उसका बस ये हाल है
.. सुनो सुनो सफेद पोश
अरे, असंख्य आतड्यांची सुतं
बुद्धासमोरही वाळत पडलीयत
कसाईखान्यातील निःष्प्राण धडासारखी
आय-भैनी दुकान-दुकानचा खेळ मांडून बसलीयंत
पीळ पिळून पिळलेली चिपाडं बेवारशी
हिंडत राजभवनाचा दिमाख बघताहेत
साक्षर काय निरक्षर काय
एकाच ढुंगणातून हगतायंत
चातुर्वण्याच्या सुवर्णशाली
सामर्थ्यशाली, धर्मशाली
आदर्श व पुण्यशाली रथाच्या खाली
पूर्वपरंपरागत करोडो शरीरं तुडवली जातायंत
चेचली जातायंत,
त्यांच्या कण्हण्यानं आजचाही माणूस बाटला जातोय
मनुस्मृतीच्या बहिवाटीची
ही रंगीत और वास्तविक पेशकश है
देखो...देखो सफेद पोश

बिनाटिकट ये फिल्लम शो !
अरे, यांची स्वरयंत्रे ओरडून आरडून
थकून गेलीयंत,
“ आसुसलेल्या हातांना काम द्या
दोन वेळा पोट भरण्याइतका दाम द्या
मान द्या
माणुसकी द्या
हक्क द्या
अधिकार द्या
नि ताठ मानेनं जगू द्या. ”
ढोंग-बहिऱ्या ढोंग-अंधळ्या सत्ताधीशांनो
असे आखडू नका, तीही माणसंच आहेत
नि मी बिनधास्तपणे खुल्लम् खुल्ला सांगतो,
“ ती आज तुमच्यापुढे भीक मागतायंत
तशीच उद्या ही तस्करी अर्थरचना ‘ पोट्टशी ’
ठेवण्यासाठी ते जाहीर समग्र बलात्कार करण्यासही
कचरणार नाहीत

पुणे

—सुरेश माटे

## पिचलेल्या मना

पिचलेल्या मना मनांना फुटू दे
रक्त-रंगी तेजाचे पंख
बधिरलेल्या मेंदूतून भडकू दे
ठिणग्यांचे पिसाट दुःख !—१

थिजलेल्या हृदयांत वादळू दे
कडाडत्या विजेचा रोष

करपल्या काळजांत उसळू दे
तडपता आवेश त्वेष !—२

जुलमी गजा-गजांतून घुमू दे
क्रांतीची कर्कश्श तुतारी
विव्हळत्या वेदनांतून गर्जू दे
जागृतीची अभेद्य भेरी--३

परभणी **सौ. विजया संगवाई**

## आमचं गाणं, आजचं, उद्याचं

लॉंग लीव्ह क्वीन
प्रिन्स येतो आहे
अफाट मैदान
अफाट डोकी
भोवती ट्रक्सची नक्षी
व्यासपीठ उंच
रक्षक टंच
क्लिक क्लिक
क्लिक क्लिक
' अहो डोके जरा बाजूला करा, शेवटच्याच
किमान चार तरी छापायला हवेत '
घरे स्वच्छ
रस्ते स्वच्छ
झाडे लावा, नसा कापा
नसा कापा, झाडे लावा
क्या बात कही वाहवा वाहवा !
बाते कम काम जादा

अदा भई अदा
भाषणान्ती आमच्याही घशाला व्यायाम
पुढच्या भाषणासाठी
घसे खरडून ठेवा
तोपर्यंत आपण आपलं गाणं गाऊ
लाँग लीव्ह क्वीन
प्रिन्स येतो आहे

पुणे **मुकुंद सोमणी**

## हात

बेगुमान राज्यकर्त्यांनो,
आजच छाटून टाका ते हात
जे क्षणी-क्षणी तुमच्याकडे
सरकताहेत...!
तुम्हास द्रौपदीला नग्न करायचे ना
मग प्रथम वस्त्र-देत्या
कृष्णाचे हात छाटून टाका
तुम्हाला सीताहरण यशस्वी करायचे ना ?
तर सेतू बांधणाऱ्या हनुमानाचे
हात छाटून टाका, म्हणजे—
द्रौपदीस वस्त्र मिळणार नाही !
रामास मार्ग भेटणार नाही ! !
नाही तर—?
हेच हात उद्या तुमचा
गळा दाबतील !

औरंगाबाद **संजय काळे**

# आणीबाणी

आणीबाणी आणीबाणी । डोळा फक्त आणी पाणी ।
मना वाटे सोन्याची खाणी । तो एक मूर्ख ॥ १ ॥

लाचलुचपत झाली बंद । सावकारीला पायबंद ।
कळून आम्हा होई आनंद । परि तो एक मूर्ख ॥ २ ॥

स्वातंत्र्य–समता–बंधुता । सर्व हृदयी एकतानता ।
उधळून लावे ही महँगता : न उरे वाली कोणी ॥ ३ ॥

आम्ही सारे भाऊ भाऊ । खाण्यापुरते एक होऊ ।
केवळ नुसता घोष गाऊ । हीच आमची एकता ॥ ४ ॥

म्हणे कुणी गरिबी हटाव । कुणी रचे वेगळाच कटाव ।
माथी आमच्या नुसती खडाव । बंगलेवाल्या लोकांची ॥ ५ ॥

झोपडपट्टी झोपडपट्टी । करून तिची हकालपट्टी ।
बंगले, माड्या उठविती । देऊनि हप्ता पोलिसांना ॥ ६ ॥

जनता जनार्दन मायबाप । करिती कौतुक बारेमाप ।
निवडणुकीनंतर साफ । हात कानावर ठेविती ॥ ७ ॥

स्वतःस समजे म. गांधी । लोकास मात्र सदैव निंदी ।
करुनि सारी अंदाधुंदी । बने पुढारी लोकांचा ॥ ८ ॥

मेंढरे हे सारे लोक । उड्या टाकिती पाठोपाठ ।
बुडता मात्र ओरड अमाप । करिती सर्वथा गोंधळ ॥ ९ ॥

कोण दुष्ट कोण सुष्ट । सारासार विवेक नष्ट ।
होऊनि करती खटपट । व्यर्थ जाण पं ते ॥ १० ॥

आणीबाणीत म्हणे कोणी । सरकारची जोगाई गाणी ।
तो गळ्यातील तन्मणी । बने संतोषी मातेचा ॥ ११ ॥

आणीबाणी जो पाळी पूर्ण । तया इच्छा सकळ संपूर्ण ।
संतोषी माता होई प्रसन्न । व्रत करिती आटोकाटी ॥ १२ ॥

कर्जत ( अहमदनगर ) **प्रा. सूर्यमाला पाटील**

## सावधान

राज्यकर्त्यांनो सावधान
हा निद्रिस्त कुंभकर्ण
आता कुठे चाळवाचाळव करू लागला आहे
त्या भीमकाय महापुरुषाला आता जाग येऊ लागली आहे
ही निद्रा संसारातील कटकटींची
ही निद्रा पोटपूजेच्या व्यथेची
ही निद्रा लाचारीची
ही निद्रा नैराश्याची
ही निद्रा वैफल्याची
ही निद्रा अगतिकतेची
पण या निद्रेलाही अन्त आहे
पहा हे ढोल वाजू लागले आहेत
भूकबळीचे, उपासमारीचे
आत्यंतिक दारिद्र्याचे
चीड आणणाऱ्या अन्यायाचे
हे नगारे वाजताहेत
सत्तांधतेचे
मदांधतेचे
भ्रष्टाचाराचे
निर्लज्जतेचे
हा कुंभकर्ण आता पूर्ण जागा होणार आहे
आणि खाणार आहे उलट रावणालाच,
कोडग्या निलाजऱ्या रावणा, सावधान !

कोपरगाव **डॉ. अरविंद रा. केतकर**

## जाग्रण वेद

सारे दिवे मालवलेले
त्यात रात्र आधीच काळीकुट्ट
रात्र दिव्यांना गिळणारी
रात्र अधिक भयाणमिट्ट
अशा या अंधारात
झोपलेत त्यांना झोपू द्यावे
कुणाची झोप शराबी असते
कुणाची झोप कबाबी असते
कुणाची झोप गुलाबी असते
कुणाची झोप नबाबी असते
जागे असलेल्यांनी
कधी त्यांची करू नये झोपमोड
नाही तर ' जागते रहो ' म्हणणाऱ्यांचीच
होते कधी कधी धरसोड
म्हणून आपण झोपलेत त्यांना झोपू द्यावे
जे पोटावर हात फिरवून झोपलेत
त्यांनाही झोपू द्यावे
जे मांडीवर हात फिरवून झोपलेत
त्यांनाही झोपू द्यावे
झोपेचे सोंग करीत झोपलेत
त्यांनाही झोपू द्यावे
जागरणाचे ढोंग करीत झोपलेत
त्यांनाही झोपू द्यावे
जे उघड्या डोळ्यांनी झोपलेत
त्यांनाही झोपू द्यावे
जे मिटल्या डोळ्यांनी झोपलेत

त्यांनाही झोपू द्यावे
जे गादीवर झोपलेत
त्यांनाही झोपू द्यावे
जे फुटपाथवर झोपलेत
त्यांनाही झोपू द्यावे
आपण कधी कुणाची झोपमोड करू नये
झोपेत कुणाचे पाय कुठे आहेत
आपण आपल्या डोळ्यांनी पाहू नये
झोपेत कुणाचे हात कुठे पोचलेत
आपण आपल्या डोळ्यांनी पाहू नये
झोपेत कोण काय बोलते
आपण आपल्या कानांनी ऐकू नये
झोपेत ऐकणाऱ्या माणसाशी
आपण कधी बोलू नये
झोपेत चालणाऱ्या माणसाबरोबर
आपण कधी चालू नये
झोपेत असताना
कुणाच्या वेणीत फूल असते
कुणाच्या कुशीत मूल असते
तर
कुणाच्या पोटात चूल असते
चुलीवर ठेवायला आपल्या हाती भाकर नसते
तेव्हा झोपलेल्यांना आपण झोपूच द्यायचे असते
म्हणून झोपलेत त्यांना झोपू द्यावे
झोपलेल्यांच्या पाठीवर [ किंवा पोटावर ]
कधी मारू नये थाप
उगाच कुणाची झोपमोड केली
तर आपल्या माथी येते पाप

झोपलेल्यांबद्दल मत्सर करण्याचा
जागणाऱ्यांना नाही अधिकार
कारण जागणाऱ्यांची मायनॉरिटी
तर झोपणाऱ्यांची मेजॉरिटी फार !
म्हणून

जागणाऱ्या मूर्खांनी कधी
झोपणाऱ्याचा करू नये हेवा
नाहीतर झोपलेले जागे होऊन
त्यांचा तुटून पडतो थवा

आपण झोपलेत त्यांना झोपू द्यावे
त्यांच्याबद्दल जरी वाटला खेद
तरी त्यांच्या समोर आपण
म्हणू नयेत ' जाग्रण वेद ! '

कुणी झोपलेले
आपल्याला पाहवतच नसले
तर झोपणाऱ्यासह
आपणही झोपून जावे
पण झोपलेत त्यांना झोपू द्यावे

**चंद्रभूषण कुलश्रेष्ठ**
सोलापूर

## हे असंच, इतकंच....

तशी ही कविता नाहीच
हे असंच, इतकंच
उगीचच लिहिलेलं काहीवाही.
तशी आमच्या घरची माणसंच शहाणी
मीच कसा असा खुळा निपजलेला—
छोट्या बेटीलाही कसं सगळं कळतं
'शहाण्या आजी'चं चित्र ओळखणंही
'टाईम्स'चं पहिलं पान असो
'वीकली'चं फाटकं पान दिसो
शहाणी आजी मल्याथोरल्या लोकांसमोर बोलत बसलेली
इथल्यातिथल्या राजांबरोबर हसत कशी दिसलेली
टेबलापाशी बसून गंभीरपणे वाचताना
कुठल्याश्या समाधीवर फूलविल वहाताना
इथंतिथं करत बेटी 'हुषार काका' ही ओळखते चित्रातला
हे काही तिला शिकवलेलं नाही कुणी
तशी आमच्या घरची माणसंच शहाणी
मीच कसा असा खुळा निपजलेला—
मम्मीलाही माहित होतं वापरावं कसं लाटणं
कसं जमायचं तिला इकडंतिकडं धावणं
सगळे हक्क तिचे कसे कळायचे तिला
मीच खुळा, का कसं वळत नाही मला
आता कशी बसलेली मुकाट्यानं घरी
शोभतेच कशी आता माझी आईच खरी
नाही कळत का कशी विस्कटलीय रंगलेली गाणी
पण तशी आमच्या घरची माणसंच शहाणी

## हे असंच, इतकंच....

तशी ही कविता नाहीच
हे असंच, इतकंच
उगीचच लिहिलेलं काहीबाही.
तशी आमच्या घरची माणसंच शहाणी
मीच कसा असा खुळा निपजलेला—
छोट्या बेटीलाही कसं सगळं कळतं
'शहाण्या आजी'चं चित्र ओळखणंही
'टाईम्स'चं पहिलं पान असो
'वीकली'चं फाटकं पान दिसो
शहाणी आजी भल्याथोरल्या लोकांसमोर बोलत बसलेली
इथल्यातिथल्या राजांबरोबर हसत कशी दिसलेली
टेबलापाशी बसून गंभीरपणे वाचताना
कुठल्याशा समाधीवर फूलबिल वहाताना
इथंतिथं करत बेटी 'हुषार काका' ही ओळखते चित्रातला
हे काही तिला शिकवलेलं नाही कुणी
तशी आमच्या घरची माणसंच शहाणी
मीच कसा असा खुळा निपजलेला—
मम्मीलाही माहित होतं वापरावं कसं लाटणं
कसं जमायचं तिला इकडंतिकडं धावणं
सगळे हक्क तिचे कसे कळायचे तिला
मीच खुळा, का कसं वळत नाही मला
आता कशी बसलेली मुकाट्यानं घरी
शोभतेच कशी आता माझी आईच खरी
नाही कळत का कशी विस्कटलीय रंगलेली गाणी
पण तशी आमच्या घरची माणसंच शहाणी

मीच कसा असा खुळा निपजलेला—
तशी आमच्या डॅडींचीही जीभ तिखट म्हणतात
इथल्यापासून तिथपर्यंत काहीबाही बोलत असतात
सदानकदा भलीमोठी गर्दी जमलेली
आता मात्र नजर का कशी हरवलेली
डोळे उघडून जगायला त्यांनीच शिकवलं मला
म्हणतात कस–खुळा तू, काय सांगावं तुला ?
म्हणतात—का बोललास ?
अस्सं काही बोलू नाही.
म्हणतात—का पाहिलंस ?
अस्सं काही पाहू नाही.
म्हणतात—का ऐकलंस ?
अस्सं काही ऐकू नाही.
डोळे बांध, तोंड दाब, कान झाक आता
खुळाच तू, नाही आता कामाच्या तुझ्या बाता
अर्थच काय ह्याचा कसं सांगत नाही कुणी
पण तशी आमच्या घरची माणसंच शहाणी
मीच कसा असा खुळा निपजलेला—
दादा मात्र शोभेल माझा भाऊ जरासा
बोलताना बोलेल, हसताना हसेल खुळासा
बोलताना इकडेतिकडे पहायचा नाही
हसताना समोरचा समजायचा नाही.
का आता माझ्यापासून दूर दूर गेलायय
म्हणतात कुणी, त्याला
शहाणीही असून बोलत कसं नाही कुणी
तशी आमच्या घरची माणसंच शहाणी
मीच कसा असा खुळा निपजलेला—
दादाचं नाव काढलं की नजरा कावऱ्याबावऱ्या

बंटीचीही नजर चित्रातनं माझ्याकडे
डॅडी पहातात भिंतीच्या कोपऱ्याकडे
मम्मीही बघतेय उगीचच इकडेतिकडे
म्हणतात कसे—खुळा रे, अक्षरही नाही काढायचं—
मग येईल तेव्हा येईल तर वाट पहात का बसायचं
बोलता बोलता का येतं मग डोळ्यांत पाणी
आहेत तरी बरं आमच्या घरची माणसं शहाणी
मीच मात्र असा खुळा निपजलेला—
म्हणूनही असेल ही तशी कविता नाहीच
हे उगीचच लिहिलेलं काहीबाही
हे असंच, इतकंच......

**विवेक गरुड**
नासिक

## आता आम्ही

आम्ही वंशज तुमचेच
सिंहाचे दात मोजू म्हणणारे
( दातांना कण्या कुणी खाऊ घातल्या ? )
आता उघड्या खुराड्याचे वासे मोजत
' अवलादीच्यांनो पैदासलं कशाला ?
पिचलेल्या हाडांना नमवलं कशाला ?
वाचस्पतीच्या जिभा आमच्या
तुमच्या सभा-सम्मेलनांना टांगल्यात
शिस्तीत शोभेच्या पताका समजून !
आणि वेळ आलीच तर कविता करून दिल्या
तुमच्या स्वागत गीताच्या–हॅपी बर्थ डेच्या !
आमच्या जिभांना तुम्ही इतकं कसं चॉकलेटाळलं !

क्रांतिचा मंत्र मुकत लाळेतच जिरला—
कुण्या भाग्यवंत शेषाने पृथ्वी फण्यावर धरली म्हणे
आमच्या जिभा वांझ नाहीत म्हणावे.
वेळ पडलीच तर खुर्चा जिभेवर तोलता येते
( हे लक्षात असू द्या— । )
तर काय आम्ही इतके करंटे नाही आहोत ।

**— विजय गं. वाकडे**

## मुक्त चिंतन

दुःखाच्या काळोखाची रात्र आली
अनंताचा प्रवास सुरू झाला
चिरशांतीच्या पाठीमागे एक
शांतीदूत निघाला
उघडे बोडके डोंगर
नुसतेच नागवे राहतात
सैतानाच्या आढ्यतेला
आपल्या पुढ्यात ठेवून घेतात.
दिवस उजाडला रात्र झाली
आकाशाचे पांगुळगाडे अनंताचे
ओझे घेऊन सूर्याकडे निघाले
क्षणभर सूर्याचा रथ थबकला
उजाड डोंगर थरारले
अंगाखांद्यांवर उगवलेले गवताचे
केस शहारले
चिमण्या पाखरांची किलबील झाली
मधुर स्वरांच्या गाण्यांनी, उमलल्या गाण्यांनी, उमलल्या
फुलांच्या सुगंधानी

उगवत्या सूर्याचे स्वागत झाले
उघडे बोडके डोंगर सजले
आणि उगवत्या पहाटेचे मुक्त दर्शन झाले

**रमेश अंचेकर**
वसमतनगर ( परभणी )

## झब्बूशाही

पक्षही त्यांचा, सत्ता त्यांची
सर्वच तानाशाही
लोकशाहीच्या बुरख्यामागे
उभी हुकुमशाही
सत्ते हाती न्याय तराजू
तोल तयाला नाही
नोटेवरती न्याय ठरे तो
लाज तयाची नाही
न्यायासाठी किती भांडती
दाद तयांना नाही
किती दिवस ही चालायाची
अशीच झब्बूशाही
हे जनतेचे राज्य कशाला
उगाच देता ग्वाही

**जयन्त भिडे**
पुणे

## न्यायदेवता

डोळ्यांवर गच्च पट्टी बांधून,
हाती तोल घेऊन
न्याय देवता उभी होती
अवघडून......तिष्ठत
माझा न्याय करण्यासाठी
एक पायरी चढून
मीच अपराध केला
करावं तसं भरावं—रीत जगाची म्हणून
असलेला......नसलेला
मिळालेला......मिळविलेला
सारा साक्षी पुरावा अलगद पारड्यात टाकला
ताजव्यांचं आंदोलन चालूच
कधी वर, कधी खाली
येणाऱ्या – जाणाऱ्या
इतरांना – साऱ्यांना
मलाही वाटलं मिळेल न्याय
एखाद्या वेळी आणीबाणीत
पण......कसचं काय
ओझं असह्य झालं
अन् काटाच मोडून पडला
आंधळ्या देवतेच्या पायी

**अनंत वेंगुरकर**

# सिंहासन

## एक

हा देश प्रचंड
देशातली सामान्य माणसं प्रचंड
प्रचंड इथलं दारिद्र्य
किनाऱ्यात न मावणारे
दुथडी अश्रू प्रचंड
आणि आज
प्रचंड सिंहासनालाही
वाटू लागलंय
जावं
गहिवरून सद्‌गदून
करावी
निदान विचारपूस
मिळेल सर्वांना
मायेची कूस
सिंहासन म्हणजे
सामान्यांचीच की
प्रचंड मूस

## दोन

स्वतंत्र आकाशाखाली
स्वतंत्र अवकाशात
स्वतंत्र जमिनीवर
वावरताना
गुलाम दिसतात
एका स्वातंत्र्याला
माणूस माणसाचा गुलाम

गुलाम सर्व पिढ्या
    इतक्या की
मेंदूमांसासकट गहाण
छातीतल्या बरगड्या
सिंहासन पोकतं पाटीतून
झुलताना स्वातंत्र्याचे प्रश्न
खांद्यावर मुक्ती घेऊन
गेलं गुलामांजवळ
पुसले अंगावरचे वळ
सिंहासन म्हणजे
गुलामांचं वळ

**तीन**

प्रेतालाही शेवटी
कापड हवंच असतं
    झाकायला
माणसं उघडी नागडी
    ठेवून
पंचा किंवा लंगोटी
    लावून
प्रेत जिवंत माणसाचं
जिवंत माणूस प्रेत
दुःखी स्वातंत्र्याला
नसतं हे अभिप्रेत
स्वातंत्र्याच्या स्वप्नात
वस्त्र असतं
वस्ती असते
मुख्य म्हणजे
दैन्याची धास्ती असते

सिंहासनाला लागतात
फुटावेच
दातृत्वाचे हात
सिंहासन म्हणजे काय
तर कापसाची वात

**चार**

हे तसं अटळच असतं की
कधी कधी
आणि
केव्हा तरी
सिंहासनाला गरज भासते
पीडितांच्या
गुलामांच्या
दारिद्र्याच्या
संदर्भांची
तेव्हा या सर्वांना
ते दिसू लागतं
इतक्या जवळून की
आपणच आहोत
त्याचे धनी
सिंहासन म्हणजे असं की
आश्रमातले कण्वमुनी

**फ. मु. शिंदे**
औरंगाबाद

## कणाहीन आकाश सर्वत्र

रक्त उगाळत सूर्य उगवतात मावळतात इथे
कणाहीन आकाश; सर्वत्र पहारा पांघरून साठून येतात चैतन्याचे आभास
खेकड्यांचे राठ पाय उगवून हे असे काळोख
मातीच्या खोल बुंध्यात झिरपत जाणारे माझे डोळे
किती सांगाड्यांचा सर्वबाही विळखा
रंगांच्या फाकत जाणाऱ्या आतड्यांपर्यंत रुतत जाईल...
कणाहीन आकाश सर्वत्र;
पहारा पांघरून झाडे आंधळ्या पानांनी माखलेली
गाताहेत उद्ध्वस्तता
इथल्या देहांच्या देठातून आवळत आलेली
टेलिप्रिंटरमधून सरकणाऱ्या बातम्यांचे ओठ गातात उद्ध्वस्तता
नवी दिल्ली, दि. २५ ( पी. टी. आय. ) च्या
सेन्सॉर्ड यमकांची उद्ध्वस्तता
सभोवार शहर—
इमारतींच्या डोळ्यांतून बेवारशी डोकावणारे
सभोवार शहर—
या गस्त असलेल्या रस्त्यांच्या फासेपारधीत सापडलेले
किती पावले वळतात इथून
भोवती गतीचे आक्रोश खुपसून घेतलेली
किती पावले फेसाळत दररोज
ठराविक वेळी कचेऱ्यांतून गर्दी करतात...
आयुष्य पुसले जात आहे
झोपड्यांच्या जटा विस्कटून;
सभोवार माणसे शरीरभर
कुणासाठी ओसंडून चाललेली ?

कणाहीन आकाश सर्वत्र
पहारा पांघरून मातीच्या खोल बुंध्यात झिरपत
जाणारे माझे डोळे;
किती सांगाड्यांचा सर्ववाही विळखा
रंगांच्या फाकत जाणाऱ्या आतड्यांपर्यंत रुतत जाईल...
हे असे उगवतच राहणार आहेत
मूळव्याध लागलेले माणसांचे संभोग
ही अशी थांगावत येणारच
जवडा बासलेली गाज या रस्त्याशहरांतून
कणाहीन आकाश सर्वत्र पहारा देणारे;
आकांतांचे काठ किती अंतहीन वाटतात...

**नरेंद्र बोडके**
गोवा

## २६ जून, तरीही एक आठवण

रात्रीच शहरात सैनिक घुसले
झोपमोड झाली म्हणून आम्ही चरफडलो
फक्त चरफडलोच
झाडावरचे कावळे बंदुकीच्या फैरी ऐकून कोकलले
आम्ही आकाश न्याहाळले
फक्त न्याहाळले
पाखरांचे मुक्त पंख आकाश व्यापत होते
साले स्वतंत्र आहेत म्हणून कोकलतायत झालं
मूक संचलन
करकचून सलाम
झेंडे नाचवत खूप नाचलो

ते पुन्हा येण्यासाठी निघून गेले
ते पुन्हा आले
पुन्हा एकदा करकचून सलाम
आता मात्र एक खवचट डोकं म्हटलं
पण तुम्ही आले कशासाठी ?
[ बहुधा त्याच्या मेंदूचं ऑपरेशन झालं नसावं ]
: साल्यांनो तुमच्याच भल्यासाठी
आणि पाठोपाठ त्याच्या कंबरेची हाडं मोडल्याचा आवाज
तेव्हा आम्हाला कळलं की
ती आमचीच माणसं होती
आता आमच्या मुलांच्या व्याकरणात
प्रश्नार्थक वाक्ये शिकवीत नाही
अजूनही त्यांची संचलनं अपरात्री होतात
आम्हालाही सवय झाली आहे
सवय व्हायलाच पाहिजे......

**मुकुन्द सोमणी**
पुणे

## व्यवस्था

सिंहाच्या सिंहासनावर चढून बसलेले कुत्रे
ओकत असतात आदेश
व्यवस्थेच्या नावावर
एखाद्या अंधकारमय रात्री
व्यवस्थेच्या खाली
अव्यवस्थाच निर्माण होते
तेव्हा दिलेलं असतं

‘ रातआंधळेपणाचं ’ ‘ कॅपसूल ’
आणि आम्ही बुद्धिवादी
हातात चमचे घेऊन
उभे राहतो एका सरळ रांगेत
कोणाच्या तोंडावर, डोळ्यांवर
तर कोणाच्या कानांवर
असतात व्यवस्थेचे पंजे
आवळलेले

**घनश्याम सांगतानी**
सेल ( मराठवाडा )

## पेटू दे आकाश सारे

पेटू दे आकाश सारे ना तमा नाही क्षिती
कोणी सावरावे कोणास, बाळगावी कुणाची भीती ?
अवलिया किती जहाले, फिरस्ते झाले किती ?
माणुसकीच्या नावे कितिकांनी लावल्या काळ्या फिती ?
धूप किती, फुले किती, ओवाळण्या यांची आरती
श्रमिकांच्या झोपडीत ना दिवा नाही पणती.
माणुसकीच्या खुन्यांना आता द्यायला हवे फाशी
माणुसकी शोधता शोधता विझल्या डोळ्यांतील ज्योती.
जगच सारे त्यांचे हात आमुचे थिटे पडती;
पेटवी आकाश सूर्या, ना तमा नाही क्षिती !

**सुहास वा. जाधव**
सोलापूर

## ही काजळलेली दुनिया

ही काजळलेली दुनिया
वाट पहाते आहे
तेजाळलेल्या क्षणांची
वठलेल्या वृक्षातून
उमलणाऱ्या पालवीची
राखेत अजून लपला आहे
तेजाचा निखारा
वाट पहातो आहे
समर्थांच्या चेतवणीची
मिटलेल्या पंखांत ताकद आहे.
अजून गरुड झेपेची
हा पक्षी वाट पहात आहे
दिव्यतेच्या स्पर्शाची
ही काजळलेली दुनिया
वाट पहात आहे
तेजाळलेल्या क्षणांची

**मीनाक्षी केतकर**
कोपरगाव

## प्रेत

अशीच अविचल संध्याकाळ
टिचकत-टिचकत काळी होते
मोठ्या गोड शब्दात ' ते ' म्हणतात
' धीर धरा रे सकाळ होते '
अंधारात दिवे जळतो पण

तुम्ही आम्हास साथ द्या
वाती आम्ही होतो
पण तुम्ही तेल व्हा
खांद्यास खांदा भिडणारे
गळ्यात, गळा घालून्या
भयाण अंधारास मिळून साथ देऊ या
'त्यांनी' हांक मारली आणि–
आम्ही गळयात-गळे घातले
आम्हालाच मग ते समजले नाही
त्यांनी किती गळे कापले......
सूर्य मग उगवला......!
माणुसकीचं प्रेत पहायला
तेव्हा आम्ही काहीच करू शकत नव्हतो......

**संजय काळे**
औरंगाबाद

## शहात्तरच्या सूर्याची कविता

माझ्या लेखणीतून वाहणाऱ्या रक्ताची शपथ
हजारोंच्या डोळयांतील धगधगत्या असंतोषाची शपथ
भुकेने कोमेजलेल्या करोडो बालकांच्या निरागस चेहेऱ्यांची शपथ
मध्यरात्रीच्या रक्ताने रंगलेल्या एका सूर्याची शपथ
मित्रांनो,
तुमच्या काळजातील ध्यानस्थ ज्वालामुखीचा स्फोट आता व्हायलाच हवा
आयुष्य संगिनीवर लटकले होते
तेव्हा युगांच्या एका यात्रिकाने आपल्या जखमा पुसल्या.
पराभवांवर फुलांची फुंकर घातली
आणि जयुष्णु पावलांनी देशभर तो एकटाच फिरला
क्रांतीचे घोंगावणारे वादळ डोळयांत घेऊन.

त्याने सूर्याला हाक घातली व सांगितले :
" तुझा प्रकाश कधीच पोचला नाही ज्यांच्या हृदयापर्यंत
त्यांच्यासाठी तेजाची एक लकेर इथल्या दिशांमध्ये पेरून ठेव. "
एक युगांचा यात्रिक :
ज्याच्या रक्ताचा एक मोठा डाग अजून
इथल्या आकाशात दिसतो.
त्याने सर्वस्व दिले तेव्हाच आमच्या भोवताली
लख्ख उजेडाचे एक स्वप्न उमलले.
आपल्या पावलांना विधवा करून तो गेला
आपण उठलो, आपण रांगलो, आपण खेळलो.
आपण उत्सव साजरे केले आनंदाच्या साऱ्या क्षणांचे
आपण विजयाचे वर्धापन दिन गाजवले.
आपण विसरलो आपल्याच आयाबहिणींना
आपण बेपर्वाईने येणाऱ्या प्रत्येक दिवसाच्या तोंडावर थुंकलो
माझ्या लेखणीतून वाहणाऱ्या रक्ताची शपथ,
मित्रांनो,
हे सारे खरे आहे ना ?
अकस्मात कुठूनतरी दारे बंद झाली
आणि आपण सारेच एका प्रचंड तुरुंगात अडकलो
कुणीतरी हुकूम दिला आणि आपली तोंडे बंद झाली
कुणीतरी हुकूम दिला आणि आपली पेने बंद झाली
कुणीतरी आपल्या आयुष्यावर संगीन रोखली
आणि आपण हिंपुटे बसून गप्प बसून राहिलो
हजारांच्या डोळ्यांतील धगधगत्या असंतोषाची शपथ
मित्रहो,
आपण सारे कुठे चाललो आहोत ?
हा आपला अत्यंत सनातन इतिहासकालीन देश
हा आपला सोन्याच्या धुराचा, रवींद्रांच्या प्रतिभेचा देश

हा आपला हरपलेल्या वाटांचा, जर्जर झोपड्यांच्या मख्ख चेहऱ्यांचा देश
हा आपला पोटाच्या मागे लागलेल्या हजारो हातांचा देश
भुकेने कोमेजलेल्या करोडो बालकांची शपथ
मित्रहो,
आपल्या घशातील आक्रोश
आता करोडो मुखांतून पेटून उठायलाच हवा
आपल्याला हवे आहे एक आकाश आणि एक सूर्य
आपल्याला हवा आहे युगांची वाट लख्ख उजळणारा प्रकाश
आपल्याला पंख हवे आहेत
मध्यरात्रीच्या रक्ताने रंगलेल्या एका सूर्याची शपथ
मित्रहो,
तुमच्या काळजातील ध्यानस्थ ज्वालामुखीचा स्फोट
आत्ताच व्हायला हवा...

**नरेंद्र बोडके**
गोवा

## उंच उंच बंगल्यांनो

उंच उंच आकाशाला
भिडलेल्या बंगल्यांनो
तुम्हास कुठे ठाऊक आहे
तुमच्या खोल खोल पायामध्ये
गरिबांच्या रक्ताचे
लाल, लाल पाणी मुरलेय ते
आणि त्यांच्याच हाडांचा
एक एक दगड बसला आहे
बंगल्याच्या रंगीत भिंतीमध्ये
नारीच्या बाहूंचा हार
गळ्यात गुंफून तुम्ही

रात्र सजवताय सुखामधून,
हाडांची काडे, रक्ताचे पाणी करून
जे बाहू आज थकले आहेत
तेच बाहू आज तुमच्यापुढे
हात पसरून उभे आहेत
पोटाची आग शमविणाऱ्या
एक तुकड्याच्या भिकेसाठी,
उंच उंच बंगल्यांनो
त्याची करुण कर्कश किंकाळी,
तुमच्या पर्यंत पोहचणारच कशी
कारण त्यांनीच तुम्हाला
उंच उंच बनवलंय
आपल्या पिचक्या हाडांचा
आधार देऊन, आधार देऊन

**सुभाष बंडू हापटे**
( नंदाग्रज ) जयसिंगपूर, ( कोल्हापूर )

## गुलाम

ओठांतलं दुःख......
ठेवावं लागतं पोटात
अमृत समजून विष घ्यायचं असतं
एकच घोटात...घशात
अन्यायाकडे पाहून
रक्त जरी तापलं तरी
थंड करावं लागतं अपुल्याच नसानसांत

पुणे **प्रमेश ( प्र. तु. वायदंडे )**

## 'तो एक स्वप्नपक्षी ....'

तो एक स्वप्न पक्षी...
१९ महिने तुरुंगातल्या पिंजऱ्यात निपजत होता
२७ वर्षे स्वातंत्र्य भोगून—
पुन्हा तो गुलामगिरीच्या शृंखलांत जखडला होता
त्या स्वप्नपक्ष्याचे पंख...
सत्ताधारी नरपशूंनी कातरले होते
पिंजऱ्यापुरताच तो चरफडत होता, फडफडत होता
स्वप्न उराशी कवटाळून...
रक्तबंबाळ झालेलं मन...
उद्याच्या आशेवर जगत होतं
त्या पिंजराधाऱ्यांनी .
बोलक्या स्वप्नपक्ष्याला कायद्याच्या वडग्याखाली
मुकं....बनविलं होतं
मुक्याचा मार सहन करून जगणाऱ्या
स्वप्नपक्ष्याचा एक दिवस उजाडला

मेलेलं शरीर स्वातंत्र्याच्या संजीवनीनं जीवंत झालं
हळूहळू स्वप्नात रंग भरू लागले
तो एक स्वप्नपक्षी पुन्हा धडपडू लागला
' भाकरी...आणि स्वातंत्र्यासाठी !...'

सोलापूर

अरुणकुमार यादव

## कोऽहम् कोऽहम्

वरवर सारे कसे शांत शांत
पण आत
खदखदतो आहे तप्त लाव्हा
असंख्य मुखे जिव्हा असून
नसल्यागत पाहत आहेत आभाळात
पण हे...
सारे असह्य होत आहे
यम यातना सीमेपार जाऊन
कण अन कण तापतो आहे
पाहतो आहे प्रतीक्षा...
बाहेर पडण्यासाठी, एक दिवस
अज्ञानाची ' झापड ' निघून
खदखदणारा प्रतिक्षीत
पसरू लागेल सभोवार
मग...
विचारवंताचे वेध, फक्त वेधच.
भाटांचे गोडवे संपून
पोट ' फुग्या 'तील चरबी वितळून
जळू लागेल आपोआप

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३०८ ...९।९५
२१६९३
शाखा (स्थळ प्रत)

आता हादरे बसू लागले आहेत
क्रांतीच्या ज्वाळांत
घोंगावत उठणारी वादळे
शेवटी काळाचे एक भेसूर हास्य
फक्त एकवार...
मग सारे कसे श्रांत शांत

पंढरपूर पंजाब शिरभाते

## श्वासांची कविता

पृथ्वी पेशींचाही लिलाव व्हावा
अशी वास्तवता
अशाच केव्हा भिंती कोसळताना दिसतील
: आपण तेव्हा नसू देखील,
आपल्याच एखाद्या अणूमधून तरीही
पृथ्वी चमकताना दिसेल,
पॅगोड्याखालून वावरताना :
जिभल्याच पाहिल्या
क्षितिज छटांमधून वासनेचे बीज उगवून
अगणित प्रस्तरातून आपण
—दुसऱ्यांचेच अभंग शिकलो
खवंदाळ अंधारातून जाताना
सोनपावले उमटवीत जाणारे क्षण
नभांत स्वप्न साकारतील
—अशी भावना
हिरव्या पणत्यांतून दिसणाऱ्या
आठवणींच्या देटांना चोखाळणे

आता,
आपलेच श्वास सापडतील भिंती खालून
अपुलेच श्वास,
कुजबूज करताना
गुदमरलेले असतील.

परभणी **रमाकांत बेलगावकर**

## राजा जागा राहा....

राणीने कॅसलिंग केले आहे.
डाव तुझा उलटला आहे.
हत्ती, घोडी, फर्जी, उंट
कोंडीमध्ये पकडले आहेत.
तुझ्या घरात, तुझ्या राज्यात
लोकशाहीचे नाव आहे.
फॅसिझमच्या नाशासाठी
नासीझम जगतो आहे.
राजा जागा रहा...
अर्थ शब्दाचे नवे सर्व
आणीबाणी, छे अनुशासन पर्व
इंदिरा रक्षा कॉंग्रेस रक्षा
छे! राष्ट्र रक्षा, लोक रक्षा.
विरोधकांना ठेचण्यासाठी
नित्य नवे उपाय चालू आहेत
आत्मरक्षणासाठी
लोकशाहीचे पोर पायाखाली घेतले आहे!
राजा जागा रहा...

तुझ्या इतका प्रबल स्पर्धी
दुसरा कोणी दिसत नाही.
रात्रं-दिवसा तुझी मूर्ती
संताजीसारखी भेडसावते आहे.
अर्ध शतकाच्या तपश्चर्येचे
तुला फळ मिळाले आहे.
तुला किञ्चित समाधान
कर्जमुक्त कामगार किसान.
कलमांच्या घोषणेमध्ये
वीसाची—एकवीस—झाले पंचवीस
पदयात्रा करता करता
जीवघेणी कासावीस.
रोज नवे वटहुकूम
जिकडे तिकडे सामसूम.
रेडिओपासून वृत्तपत्रांपर्यंत
प्रचाराची धामधूम
लोकशाहीसाठी, छे! आत्मरक्षणासाठी
आश्वासनांची खैरात आहे.
७७ च्या निवडणुकांसाठी
काँग्रेस आता सिद्ध आहे.
राजा जागा रहा...
उरली सुरली तुझी प्यादी
केविलवाणी झाली आहेत.
विवेकाच्या खेळीने
फर्जासाठी सरकत आहेत.
सी. आय. डी. चा ससेमिरा
तोंडी त्यांच्या मौन आहे
चिर—विजयाची कामना

उरी त्यांच्या ज्वलंत आहे.
राजा जागा रहा...
एक दिवस असा येईल
राष्ट्रभक्तीने तुरुंग जड होईल.
कंसाच्या संहारासाठी
कृष्ण मुक्त होईल.
सत्याचा विजय अटळ आहे,
जरी असत्याच्या बाजूने न्याय आहे.
सूर्याला झाकण्यासाठी
काँग्रेसची कांबळ लहान आहे
राजा जागा रहा...

**प्रभाकर कुलकर्णी**

## आभाळ दाटून आलंय

आता आभाळ दाटून आलंच आहे
तेव्हा माणसांनी रस्त्यावर यायला हरकत नाही.
ज्यांनी पाहिले नसेल अद्याप
डोक्यावर नेहमीच असणारं असीम आकाश
त्यांनी चुकूनसुद्धा वर पाहू नये.
ज्यांच्या घरात कधीच पोहचत नाही
सर्वसामान्य सूर्यप्रकाश–त्यांनी रस्त्यावर येताना
मेणबत्त्या पेटवून हातात आणाव्यात
ज्यांना दिवसादेखील कोकावणाऱ्या घरातल्या काळोखाची
ओळख नाही त्यांनी फक्त घराच्या दारापर्यंत यावे
ज्यांना स्वतःच्याच विचारांची भीती वाटते
त्यांनी आभाळापुढे हात पसरावेत डोळे मिटवूनच!

आता माणसांनी थव्याथव्यांनी निर्विकारपणे
रस्त्यावर यावे–गर्द मुक्या ओठांनी
आता एरवी आभाळ दाटून आलंच आहे
तेव्हा माणसांनी रस्त्यावर यायला हरकत नाही

औरंगाबाद **जी. ब. आनंदगावकर**

## हीच माती

हीच माती संथ होती—
हीच माती ज्वालामुखी बनली
हीच माती अहिंसा होती—
हीच माती अमानुष बनली
हीच माती सीता होती—
हीच माती कैकयी बनली
हीच माती संमिश्र होती—
हीच माती मिश्रण बनली
हीच माती देशप्रेमी होती—
हीच माती स्मगलर बनली
हीच माती पवित्र होती—
हीच माती सावत्र बनली
कारण—
या मातीच्या स्वातंत्र्य सूर्याला—
खुर्चीखाली कुणी अडून ठेवलंय
अजून खूप सांगावेसे वाटते—
पण ओठही माझे कुणी शिवलेत सूर्यबिंका

सोलापूर **सूर्यकांत ना. कामून**

## लोक ( स्वाही ) शाही गीत

मी एक मुका
तू एक मुका
आपण सर्व मुके आहोत
मी एक बहिरा
तू एक बहिरा
आपण सर्व बहिरे आहोत
ही मुक्या–बहिऱ्यांची शाळा आहे
शाळेची महत्त्वाची अट
मुके बहिरे नसले तरी चालतील
पण बहिऱ्यांना मुके करूनच घेतले जाईल
तसं पाहाला गेलं तर बाईंना
काही येतच नाही
तरीपण आम्हाला त्यांचा
स–कलमी ( सकल–मी ) होमवर्क करावाच लागतो
आमचं फक्त एकच काम
डोळ्यांनी पाहायचं आणि डोळ्यांनीच बोलायचं
दूरदृष्टी–सपाटून काम
एकच जादू
सांगाल तसे वागू
अशातच समजलंय की
लवकरच ही शाळा अंध, मुके आणि
बहिरे असणारांचीच होणार आहे म्हणे.

औरंगाबाद

**वैद्यकीय विद्यार्थी**

## आमचे प्रतिनिधी

आमचे प्रतिनिधी
आम्ही शोधत आहोत
...आमची घरे आमच्या बंदिशाळा
बघता बघता
पुन्हा शृंखला
आम्ही पुन्हा निराश होत आहोत...
...आमच्या पाठीशी असतात
दिवसा ढवळ्या
हारांनी भरलेल्या तसबिरी
रात्री न्यायदेवता स्वप्नात येतात
गारद्यांना पाझर फुटतात...
हे कुशाग्रबुद्धी
प्रतिपालक राजा,
छद्मी आहेत हार
तुझ्या तसबिरीला घातलेले
...दुर्गंध येत असेल
तुझ्या श्वासातून
बघत असशील तू
एका गुडघ्यावर बसून
गंगेच्या प्रवाहात
उड्या मारत बसलेली
ही गांडुळे......
हे वीराग्रणी पुरुषा
खुपत आहे आम्हाला
तो दोर ती गाठ
जिचे तू चुंबन घेतलेस

...आभाळ शोधलेस
ते तेज आम्ही
शोधत आहोत...
हे कर्मयोगी नेत्या,
आम्ही नतमस्तक होतो
जेव्हा प्रहार होतात
आमच्या अस्मितेवर
मूलभूत हक्कावर...
चीड येते त्यांची
जे तुझे वारस म्हणवतात
तुझा शेंदूर फासून
...चेहरा लपवून ठेवतात
' त्यांचे ' रहस्य
आम्ही शोधत आहोत
आमचे प्रतिनिधी
आम्ही शोधत आहोत ..
...हा रंगीबिरंगी झगमगाट
स्वार्थासाठी हा थयथयाट...
आम्ही बघत आहोत
कनक, कांता भोगून
वारसाहक्काने
अलगद् बिळात शिरू बघणारे
बिलंदर प्रतिनिधित्व
त्याला पाळण्यात घालून
टाळ्या वाजवत जोजवणारे
नपुंसक वाघ्ये...
हे महात्म्या,
आम्ही कलंकित आहोत

आम्ही येऊ शकत नाही
तुझ्या घाटावर
त्यांच्या सारखी सुरेल प्रार्थना
आमच्या मुखात येत नाही
...रघुपति रघुपति
मिठात मिसळली माती...
...हे जगन्मान्य नेत्या,
आम्ही प्रभावित झालो होतो
तुझ्या साधेपणाने,
ग्रामराज्याच्या तुझ्या स्वप्नाने...
तू गेलास
माकडांच्या हाती
हे लोकशाहीचे खेळणे देऊन
आम्ही खेळ बघत आहोत...
...निराश होत आहोत
आमचे प्रतिनिधी
आम्ही शोधत आहोत...

पुणे **नारायण प्रल्हाद आवटी**

## हे सूर्यदेवा

कंटाळा आला आता तुमच्या एकचक्री चालीचा
पूर्व पश्चिम थकल्या आता तुमच्या किरणांची
देवघेव करून.
दहांपैकी आठांना आराम देऊन
दोघांनाच कामाला लावण्याची
तुमची असमाजवादी कृती बदलण्याची वेळ आता
आली आहे.

इतक्या वर्षांच्या भारतावरील भ्रमंती करून
हे तुमच्या लक्षात आलेच असेल,
की हा देश आता बदलला आहे.
तुमच्या सारख्या सरळ चालीच्या लोकांनी
चाल बदलून चालण्याची वेळ आता आली आहे.
म्हणून म्हणतो,
पूर्व-पश्चिम खिडक्या असणाऱ्या भाग्यवान घरांनाच
प्रकाश पुरविण्याची
तुमची असमाजवादी कृती बदलण्याची वेळ आता
आली आहे.
शिवाय इथे आता लोकशाही प्रस्थापित झाली
असल्याचे तुमच्या लक्षात आलेले असेल
तुम्ही आता तुमच्या मताने चालू नका.
तुम्ही कसे वागावे हे लोकमताचा कौल घेऊन आम्ही
ठरवू
आणि लोकसभेत एक बिल पास करून टाकू.
लक्षात ठेवा.
तुमची गती काही वेगळीच दिसली,
तर राष्ट्रपतींचा हुकूम जारी करू.
तसे तुमच्यावर आरोप बरेच आहेत.
तुम्ही उगवता म्हणून
अनेकांचे अनेक व्यवहार उजेडात येतात.
इतकी वर्षं
नको तिथे किरणे खुपसून निदान हे तरी
तुमच्या लक्षात यायला हवे होते की
अंधारातले कोणते व्यवहार केव्हा उजेडात आणायचे
हे आधी ठरवावे लागते.

ठाणे **श्री. रमेश पानसे**

## दीप नवे उजळू

इतिहासा का रडसी वेड्या नको अश्रू ढाळू
अरे, तुझ्या मंदिरात आम्ही दीप नवे उजळू
माहित आहे तुझी वेदना आकाशाएवढी
तव नयनांनी भरुन आणल्या अश्रूंच्या कावडी
चिखलामधुनी कमळ उमलते सौंदर्याची खनी
ठाऊक असता सारे का मग अश्रू हे लोचनी
सोडून दे ही व्यथा, नको रे हृदय असे जाळू
अरे तुझ्या मंदिरात आम्ही दीप नवे उजळू ॥
न्यायाचा दंडा हाती तेच थोर होती
मानवतेचे रक्षणकर्ते आज चोर ठरती
जुलमाचे साम्राज्य नांदते भोगत वैभव येथ
हीच आजच्या पुरुषार्थाची-सामर्थ्याची साक्ष
' पुनरावृत्ती अशीच होणे ' नको असे वरळू
अरे, तुझ्या मंदिरात–
आज उसळते रक्त आमुच्या नसानसांमधुनी
त्वेष आणि आवेश गर्जतो मनामनांमधुनी
उलथून टाकू राज्य आम्ही हे धुंद वासनांचे
अधिष्ठान अन् नवीन निर्मू दिव्य भावनांचे
मानवतेस्तव हृदय मशाली लखलखत्या पाजळू
अरे तुझ्या मंदिरात आम्ही दीप नवे उजळू ॥
तुझी प्रेरणा असेल आम्हा नित्य स्फूर्तिदायी
चिरमंगल तव हस्त आम्हांला सदैव वरदायी
उद्या इथे तळपेल आमुच्या स्वप्नातिल नगरी
विनम्र अमुच्या मुजऱ्याचा तू पहिला मानकरी
तरुण मनांची कळयाफुले तव चरणावर उधळू
अरे तुझ्या मंदिरात आम्ही दीप नवे उजळू ॥

पुणे

**अरुणा ढेरे**

## तोंडाला कुलूप

आळीमिळी गुपचिळी
हाताची घडी–तोंडावर बोट
आमच्या तोंडाला लावलय मोठं कुलूप
फक्त एक फट ठेवली आहे
लाळ घोटण्यासाठी

नासिक — **ॲडव्होकेट**

## प्रगती

हा आमचा महान विजय आहे
पंचवीसशे वर्षांत साधला नाही असा बदल
केवळ पंचवीस वर्षांत
करू शकला स्वातंत्र्योत्तर भारत !
हे कसे शक्य झाले ?
आश्चर्य करू नका !
आम्ही मागे जाऊन वेद पाहण्यापेक्षा
फक्त पुढील काळाचा वेध घेतला
त्यातून उदयास आले एक महान तत्त्व
ज्याने भारताचे भविष्य बदलले
खऱ्यापेक्षा बऱ्याची कास धरावी
क्रांतीचा उगम यातच आहे
खरे बोलण्यापेक्षा बरे बोलावे
खरे वागण्यापेक्षा बरे वागावे
उदा. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना
खरे मार्क देण्यापेक्षा बरे मार्क द्यावे
यामुळे विद्यार्थ्यांच्या असंतोषाचे मूळच छाटले जाते

आणि शिक्षणक्षेत्रात शांति नांदते
न्यायाधीशांनी निकाल देताना
कायदे पहाण्यापेक्षा फायदे पहावेत समाजाचे
याने सरकारी धोरणांना हातभार लागून
देशातंर्गत शांतता निर्माण होते.
आमदार खासदारांना तर शपथ घ्यावी लागते
घटनेवर हात ठेवून
या तत्त्वाचे पालन करण्याची
त्यामुळे समाजाचे हे सारे महान सेवक
त्यानेच देशाचा हा सुवर्णरथ प्रगतिपथावर ओढून नेला वेगाने

**रमेश पानसे**

## आरती

जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती
कृपा असो द्यावी तव आम्हावरती ।। जयदेव ।।
कृपा झाली तुमची पूर्वी वर्षाच्या
झाली स्वस्ताई कृपेने तुमच्या
दंडिले तस्कर तैसे भास्कर
कोणाचा ना काही कोठे लडीवार ।। १ ।। जयदेव
संप टाळे-बंदी सारे हे बंद
भांडणेही बंद, बोलणेही बंद
कोठे कोणाचा श्वासही बंद
बंद बंद सारे अवघे बेबंद ।। २ ।। जयदेव
निर्वैर झाले आमुचे मार्ग
अनुशासनाची नव्याने जाग
गल्लीबोळातून लाल त्रीकोण

विरोधाची झाली अती दाणादाण ॥ ३ ॥ जयदेव
ऐसी राहू दे अनुशासन रीती
खुर्ची राहू दे आमुच्या हाती
जनकल्याणाची आगळी रीती
मोदकाची राशी तव देऊ हाती ॥ ४ ॥ जयदेव

**युवक ( एकता )**

## गोंधळ

नमो मूळ महामाये। भक्तांसह गोंधळा ये ॥
उदे उदे उदे उदे। ऐक आमचा गोंधळ वये ॥
‘ उदे उदे ’चा आंधळ गोंधळ
ढोल वाजवा झडवा संबळ
सद्‌गुरू सबको मंत्र बतावे
उदे बोलनि भगत बतावे
बाबा देती अकसिर इलमा
पढो ‘ उदे ’ चा पवित्र कलमा
उदे उदे गे जय माताजी
झील धरा रे बोला जीजी ॥ उदे उदे उदे उदे ॥
मावळतीला दीस उगवला
उदे उदे तुम्ही त्याचा बोला
रेडा जर का गाभण झाला
उदे उदे ने दुभवा त्याला
उदे उदे ची एकच विद्या
विद्यार्थ्याला तारिल सद्या
उदे उदेची चढता मस्ती
दुनियामें हर जिन्नस सस्ती ॥ उदे उदे उदे उद ।.

उदे उदे ही संजय-गीता
शंकर गाई हलाहल पीता
अपयशवंती उदे म्हणावे
अपुले आसन घट्ट करावे
उदे म्हणावे येता रजनी
पाप जातसे सारे पचुनी
उदे उदे गे जय माताजी
संतोषी मा हो तू माझी ॥ उदे उदे उदे उदे ॥

**प्रा. वसन्त बापट**

## धिक्कार असो—धिक्कार असो

सत्तेसाठी सत्य सोडुनी
लाचारीचे जिणे जगावे
समर्थापुढे लाळ घोटुनी
मानधनांना हिणवीत जावे
आज एक तर उद्या वेगळे
शह आपुले फिरवित जावे
आपुली गादी संभाळाया
खुशाल टोपी फिरवित रहावे
लांगुलचालन धर्म जयाचा
खानाचा जो शोभे वंशज
नामर्दाच्या अशा जिण्याचा
धिक्कार असो धिक्कार असो
गुलामगिरिला म्हणे नम्रता
बळजबरीला शिस्तप्रियता
डंका पिटुनी लोकशाहीचा
दडपशाहीचा फिरवित सोटा

देशासाठी तिळतिळ झिजती
        त्यांचेसाठी बंद कवाडे
देशद्रोही खुशाल म्हणती
        दिल्लीवरती रोवू झेंडे
लाचारांचे जमवुन तांडे
        खुशीत खाई मनात मांडे
स्वजनद्रोही अशा नराचा
        धिक्कार असो–धिक्कार असो.
स्वातंत्र्याचे पूजक आम्ही
        स्वतंत्रतेला देव मानतो
तुच्छ आम्हाला गुलाम वैभव
        मुक्त जीवना धन्य समजतो
सैतानाची जुलमी राज्ये
        पूर्वी होती पुढती होतिल
वेळोवेळी धुळीस मिळवू
उद्दाम असे अमुचा निश्चय
        निश्चय ज्यांचा डळमळलेला
जुलमा पुढती झुकती माना
        पाठ दावुनी पळती त्यांचा
धिक्कार असो धिक्कार असो ॥ ३ ॥

धुळे                                                            दिनकर दातार

## ' मी ' वारा एक युगाचा

संपूर्ण आयुष्याच्या युगात माझ्या
मी वारा होऊन जगलो
चाहूल मरणाची झाल्यावरही

जगी आवर्जुन सांगत राहिलो :
" मी वारा आहे "
झुळझुळ हवेचा फालतु मवाळपणा
मी कधीच वाळगला नाही
सोसाट वादळी क्रौर्य, मी कधीही अंगीकारलं नाही
मी वाराच राहिलो आहे आजपर्यंत...
वाऱ्याच्या वेगाने वाहताना आयुष्यभर
उघड्या डोळ्यांनी पाहिलेल्या सत्यकथा
उमटल्या आहेत माझ्या चेहऱ्यावर
अन् याच लक्तरलेल्या, फाटलेल्या जीवांची गाथा
केविलवाणे कारुण्य घेऊन
भळभळत असताना; मी धावलो
त्यांचा कैवार घेऊन...आणि त्याच आठवणी
उमटल्या आहेत माझ्या पाटीवर ( विहारातून वहाताना )
नवतरुण रक्ताच्या साक्षीने
मीच त्यावर मीट चोळलंय आणि
प्रखर विषमतेच्या उन्हामुळे
जेथे अमर्याद शोषण होते
चालत्या फिरत्या हाडांच्या सापळ्यांमधून
जेव्हा ओणवी मूक टाहो फोडत असते,
अघोर अन्याय चक्रे चेंगरत असताना दुर्बलांना
बेलगाम अत्याचार माजवत असतो बेबंदशाही
अन् अंदाधुंद भ्रष्टाचाराच्या थयथयाटामुळं
माणसं जेव्हा कुत्र्याचं जिणं जगतात तेव्हा
मानवतेची वाफ होत असते,
प्रत्येक शोषिताला ओळखीचा आहे
हा माझा वावटळी चेहरा, आणि
हाच चेहरा घेऊन थंड करताना वाफेला

धूळ फेकणाऱ्यांनी बोंब उठवलीय
माझा चेहरा हिंसाचारी आहे म्हणून.
थोतांडाच्या थारोळ्यात
सत्याचा उघड्यावर खून करून
पुण्याईला कालिमा फासणारे आणि
प्रेषितालाच गोळ्या घालून
खोट्या सत्कर्माच्या धुंदीत झिंगलेले
माझ्या दायित्वालाच धुराडी करू इच्छितात !
पण या जगातील
पर्णा–पर्णांना ठाऊक आहे
मग फांद्या आणि बुंध्यांनी केलेला
मला न जाणल्याचा खोटा जगजाहीर बहाणा
मी कशाला हाताळू ?
वाहताना मी
माझ्या आयुष्य प्रवासात
भेटले मला
एक भिजलेले क्षितिज
सतत वाहणाऱ्या अश्रूने डोळ्यांतील
भिजले होते त्याचे अंतरमनसुद्धा
त्या अश्रूंना मी विचारले :
का एवढा खळखळाट आला तुम्हा ?
" जगताच्या अंगणात निर्जीवांनाच तर आता
उरल्या आहेत भावना..., " शब्द ऐकू आले :
" आयुष्यभर फाटलेल्या जीवनांची लक्तरे जोडताना
तुझ्या आत्म्याला बसलेल्या चटक्यांचे प्रतिसाद
या क्षितिजातून गळत आहेत
ही ओली धगधग
अंधांना अजून जाणवत नाही

पण
धवधव्याच्या प्रचंडतेत
उन्मळल्यावर ह्या ज्वाळा
क्रांतीच्या प्रवाहात बुडवून टाकतील सर्वांना
त्यांच्याच काळ्या कर्म-कहाण्यांतून
लालभडक रेषांनी भडकणाऱ्या ज्वाळा.
कुकर्म्यांना जाळून आदर्शांच्या अंबरीचा वाव घेतील!
तोपर्यंत तू असाच वाहत रहा
कारण
त्या ज्वाळांचा जन्म, तुझ्यामुळे अहोरात्र घडणाऱ्या
श्वासाश्वासांतूनच होणार आहे!"

विद्यार्थी, अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद **विझा भुरे**

## वृद्ध सूर्याविषयीचे स्थैर्य-स्वगत

रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून गच्च गर्दीने
आम्ही टाळ्या पिटू आत्यंतिक उत्साहाने
जेव्हा तू करीत असशील तुझा शेवटचा प्रवास
खालमानेने पराभवाच्या महामार्गावर
आम्ही आखून देतो कोणालाही पराभवांचे महामार्ग
आणि गरज पडली तर खांदाही देतो तेवढ्याच उत्साहाने
महान आत्म्यांच्या प्रेतयात्रा शृंगारण्यात आम्ही
मानीत आलो आहोत कृतार्थता
ऐतिहासिक काळापासून
आम्ही ऐसे बिलंदर की
आम्ही सफय्या टांग मारतो प्रेषितांना
त्यांच्या भिकेच्या झोळीतील प्राप्तीवरही

डोळा असतो आमचा संशयित नजरेचा
त्यांच्या अस्वस्थ बुबुळांतून दूरस्थ सूर्यांचे
फोटो घेतो आम्ही
कॅमेरे सरसावून तात्त्विक पेचांचे
आणि त्यांच्या निगेटिव्हज सादर करतो
व्यासपीठावर, ग्रंथांच्या मुखपृष्ठावर पुराव्यादाखल
सायंकालीन संधिप्रकाशात स्वस्थपणे स्थिरावून स्वगृहांच्या सौधावर
आम्ही शोकगीत गातो सूर्यांचे
'गिळला रे गिळला—काळोखाने सूर्य गिळला...वगैरे
आणि मग शांतपणे सोपान उतरून शय्यागृहात येतो
पांघरून सायदार सुख निर्विघ्नपणे झोपी जातो.
असता चाललेला असा अक्षय दिनक्रम
तुझ्यासारख्यांच्या अस्वस्थ बुबुळांतील दूरस्थ सूर्य
अचानक उगवतात खिडकीपासच्या फुलझाडावर
कल्लोळ उसळवीत सहस्र किरणांचे
आमची परवानगी न घेताच,
आम्ही विचारतो तुला
काय अधिकार तुला आमची पांघरुणे हिसकावण्याचा ?
काय अधिकार तुला आमच्या बागेत शिरण्याचा ?
काय अधिकार तुला आमच्या बंद फाटकाचे कुलूप तोडण्याचा ?
काय अधिकार तुला आमच्या गुहांची कवाडे खोलण्याचा ?
काय अधिकार तुला आमच्या आत्म्यांवर टिचकी मारण्याचा ?
थकलेल्या हातात एक थरथरती मशाल घेऊन
रेणूरेणूंत उसळणारा तू उभा
थंड दशकांच्या पायऱ्यांवर मधोमध अविचल
एक हात उंच उभारून त्याचेही नेमके एक बोट
तू उच्चारतोस एकच आदेश
आता शेवटचीच संधी माझ्या बांधवांनो

घोंघावत येणाऱ्या काळोखावर धडक मारण्याची
नकोत काठ्या नकोत लाठ्या
नकोत हत्यारे नकोत बंदुका
फक्त नमवू नका लाचारीने माथा
आणि निर्भय ऐका आत्म्याच्या हाका...
खरे आहे रे सगळे तुझे सांगणे
जसे असते प्रत्येक प्रेषिताचे प्रत्येक युगात काळोखाच्या
खिस्ताचे असते, बुद्धाचे असते, मार्क्स, माओचे असते
पण म्हणून काय इतके सोपे असते
कवाडे उघडणे ? भिंती पाडणे ?
आम्हाला घ्यायलाच हवा होता
स्वसंरक्षणात्मक पवित्रा
ते सोयीस्कर असते आणि, विधिमान्यही जसा
भुकेकंगालांच्या भूकमोर्चावरील सरकारी गोळीबार
म्हणून आम्ही रवाना केले घाईघाईने
आमच्या विचारांचे अग्रदूत
काठी टेकीत टेकीत ते पसरले सर्वदूर
अणुस्फोटातील धुळीसारखे
कोणाचे विचार कोणाचे विस्तार,
कोणाचे विलाप, कोणाचे मुखलेप
कोणाचा भविष्यकाळ, कोणाचा भूतकाळ
आम्ही रचीत गेलो हे सर्व तुझ्या मार्गावर अक्कल हुशारीने
आणि मग आम्ही प्रश्न पुकारले एकापाठोपाठ एकेक
कोणी दिले तुला हे धोतर ? ही विजार ? हा चष्मा ?
आणि त्यामागची दृष्टी ?
कोणी दिली जिव्हा ? वाणी ? आणि उच्चारांची शक्ती ?
कोण तुझा बोलविता धनी ? यातायात कोणासाठी ?
कोणती तुझी विचारसरणी ? लाल रंग की पांढरा ?

कितीसे तुझे पाठीराखे ?
कितीसे आहेत तुझ्या पाठीशी ?
आसेतु हिमाचल निद्रिस्तांचे प्रतिनिधी ?
शेवटी आम्ही जाहीर करून टाकले
अरे हा पळपुटा—पळपुटा—
अनेकदा याने पळ काढलाय भर संगरातून
याचे जीवन म्हणजे एक स्वयंवंचित शोककथा !
इतक्या प्रश्नांचा फौजफाटा आणि हरकतींचे गुप्तहेर
नाक्यानाक्यांवर उभे केल्यानंतर
तुझ्यासाठी पराभवाचा रूट मार्च आखून देणे
आम्हाला अगदीच सोपे होते, अगदीच सोपे होते !
पराभवाच्या महामार्गावरून
तुझा शेवटचा एकाकी प्रवास चालू असताना
रस्त्याच्या दुतर्फा गच्च गर्दीने उभे राहून टाळ्या पिटताना
आम्ही मूल्यमापनात्मक—सा निष्कर्ष काढू विनाविलंब
सैतानाशी झगडणाऱ्या माणसाचा
शेवटी असाच पराभव होतो !
सैतान म्हणजे केवळ सत्ताधीशच नव्हे,
रस्त्याच्या दुतर्फा उभे असणारे आम्हीसुद्धा !

(आगामी 'हिंदुस्थानच्या वेशीवरील स्वगते 'मधून)

**ह. मो. मराठे**

## कविता

हिमप्रपाताएवढं क्लिष्ट असायचं बोलणं
संथ दीर्घायु अर्थाचे संदर्भ उलगडत
आणि एकेक शब्द वेचत

मी रहायचो रक्ताळ माणकांसारखे
तुमच्या पुढ्यात पसरलेले
तुम्ही ढोंग सगळी समुद्रापार लोटलेली
तुम्ही घडवलेली पायांखाली वाळूची वाग-
आग, तुमच्या सोयीस्कर ओच्यात
पेहरून तुम्ही सांगितलेली अन्वर्थक कामं मला,
आणि इतर म्हणायची तुम्हाला
की तुम्ही अहात मेलेली कुत्तरडी माणसं
तुमच्या आयुष्याचे व्याप होते सालंकृत
पण ढुंगणावर नव्हत्या कोऱ्या चिंध्या
मनगटांवर नव्हती कलावतुची फुलं
डोक्यावर साधा जळाऊ लाकडाचा भारा
सगळा तुमचा होता तुम्हीच निवारा
तुम्ही विचारला मला एकच प्रश्न
माझ्या डोळ्यांत रुळवून तुमच्या तीक्ष्ण नख्या
की तुम्ही भाषांतरित केलेली सगळी दुनिया
मला समजू शकेल का ?
मी ओसरलो माझ्यातल्या आत आत
आणि मला कळाला तुमच्या प्रश्नाचा सुगमरोख
मी मोजली तुमची सगळी पावलं
मी दम धरला आखडून
आणि मीही धावायला सुरुवात केली बरोबरीने,
मीही विचारला इतरांना महत्त्वाचा प्रश्न,
की आम्ही निदान एवढेच आहोत का
या जगातले खुजे लाकूडतोडे ?
खरोखरीचे लाकूडतोडे

("**तुलसी परब**" 'संसद' जाने. ७७ मधून)

## विध्वंसक हा जन्म नवा !

का ? काली ही माय भवानी
कोण मारिते रिपु नवा ?
निज माता का ? पुत्र हारी
कुलटा कुल विध्वंस कसा ?
विध्वंसक हा जन्म नवा ॥ १ ॥

अरी वारिणी पुत्र मारिणी
क्लेशदायिनी, भयावतार कसा
हिडिम्बाच ही पेटवूनिया
विकृत हास्य प्रकार नवा
विध्वंसक हा जन्म नवा ॥ २ ॥

माताजी हि जी ऽऽ माता
ळळया सलामा बाजार हवा
कमान करुनी कणा नवा
मार्ग पोट जाळण्यास हवा
विध्वंसक हा जन्म नवा ॥ ३ ॥

स्वातंत्र्याची भयाण भीति
प्रचारास्तव विषय नवा
उद्ध्वस्त करूनी मूल्ये सारी
लोकशाहीचा भास हवा
विध्वंसक हा जन्म नवा ॥ ४ ॥

वसमतनगर ( परभणी ) सत्यविजय अन्वेकर

## सैबेरिया !

श्रू ! कोणी बोलायचे नाही.
हाताची घडी. तोंडावर बोट
पांखरांची शाळा भरे पिंपळावरती
छे ! पाखरांची किलबिल नको
सारीं पाखरं बंदुकीने टिपून काढा
पांखरेसुद्धा गातील स्वातंत्र्याची गाणी
भिडतील खुशाल भल्याखुल्या आभाळाला
पांखरे निसटतील. त्यांना पंख असतात
ते पंख आधी जायबंदी करा
पाखरे गातील
त्यांच्या माना पिरगळा
गाण्याचाच गळा घोटा
हा गोंगाट थांबलाच पाहिजे
पाखरांच्या किलबिलाटात होतोय्
घोषणांचा आभास
आता घोषणा नको.
आता घोषणा बंद
काम हवे, घाम हवा
आता तास एका अखंड कवायतीचा.
न सरणाऱ्या रांगेतून
असेच पुढे चला
आता नवा धडा बोकायूचाय्—
भ भ रे भाकरींतला
ल लसणीतला नव्हे
नव्हे लोकशाहीतला !
लोक संपले

आतां शाही सुरू झाली !
तर ही गोष्ट शहाजाद्याची नव्हे.
बगदादच्या शहाजादीची
गोष्ट बख्ताची, तख्ताची
तख्तासाठी सांडल्या जाणाऱ्या रक्ताची नव्हे
गोष्ट केवळ तख्तावरल्या शहाजादीची
शहाजादी सलामत तर ' सख्ते ' पचास
ही तख्ते. तख्तपोशी, तकिये, लोड
रंग महालातले. लवंडेदेखील.
रंगमहालात हुजरेमुजरे
राणीचा दरबार रंगमहालात
न्यायनिवाडा रंगमहालात
दरबार बरखास्त
आता रंगमहालच सुरू.
शहाजादीचा हुकूम आहे
महालात दरबाराची भाषा—
कोणी बोलायची नाही.
दरबाराचा पोशाख करायचा नाही
तरवारीवर मूठ कोणी ठेवायची नाही
' मिशा ' छाटून सारे पुरुष
महालात मुजऱ्याला हजर होतील.
मुजऱ्याला हुजरे हजर आहेत
साकी ! प्यालाभर
सरदारीच्या पगड्या उतरवून
आलेल्या हरेक हरामजादाला नशा चढू दे !
इष्कमस्तीची मिजास आपल्या जनानखान्यातदेखील
जे बोलणार नाहीत
त्या लौंड्यांना गाऊं दे ' इष्का 'ची गाणी !

शहाजादीला प्यारे आहेत
असले ‘ खच्ची ’ लौंडे
ते करणार नाहीत
दरबारी कारस्थाने
शहाजादीला ठाऊक आहे
महालामधल्या एकवीस खांबात
एकेक पुरुष गाडला आहे !
शहाजादीचा बाप
शहाजादीला म्हणाला,
बेटी, सब्र कर
इतकी बद-मिजाज बरी नव्हे
बरा नव्हे इतका बदफैलीपणा !
तर शहाजादीने बापालाच
आपल्या ठरवले बागी
नि चिणला त्याला
ह्या रंगमहालातील
एकवीसांतील एका खांबात !
हा रंगमहाल शहाजादीचा
हे कबरस्तान दगाबतखोरांचे
ही कहाणी बगदादच्या—
तख्तनशीन शहाजादीची !
त्या बगदादच्या शहाजादीला
बनवायचाय ऐनेमहाल
गुलामांनो रांगा धरा.
रांगा धरा कवायत करा
घोषणा नको, घाम गाळा
आता धडा घामाच्या कामाचा
धडा नवा, नवी शाळा,

शाळा सुरू झाली
शू ! कोणी बोलायचे नाही
पिंपळावरल्या शाळेतील
पाखरांनीदेखील किलबिलायचे नाही !
शाळा सुरू झाली, रांग सुरू झाली
पाखरे बंद गाण्यासकट
आता सारेच गुलाम चालवले जाताहेत
एका सैबेरियाकडे !

**नारायण रा. पेडणेकर**

## देशाच्या अस्तंगत आकाशातून

अस्तंगत आकाशातून अचानक
जेव्हा कोसळल्या मुसळ धारा
आधीच ओस पडलेल्या हमरस्त्यांना
जमावबंदी जारी झाली
रहदारीला खुले असलेले
हे लांबरुंद हमरस्ते
आम जनतेसाठी आता बंद.
खरं तर माझ्यादेखत
माझ्या देशाच्या आकाशाला
कधीच नव्हती सूर्योदयासाठी पूर्वदिशा
अशा दशेत,
आता अवती भवती कोसळत मुसळधारांनी,
जणु रोखल्यात
लोकांवर धारदार संगीनी आपल्याच आपल्या,
उभारल्या बॅरीकेडस्

गिलोटिनची ब्लेडस न्
आसुडांचा कडकडाट
अलिप्त आकाशात.
आपण हे सगळंच सोसत
निपचित, चौकाचौकात, मख्ख पुतळ्यासारखे
माणसांचे वध्या कठडे झालेले
राजमार्गावर रंगलेला तमाशा बघण्यात दंग,
पहात हजारो हिजड्यांच्या रॅलीज
जवळून जांत येत आणि
वाहत जाणाऱ्या फुटपाथवरनं
गांडूंच्या फॅशन परेडस्
युनिसेक्स कपडे अंगी चढवूनही
मानेवर ज्यांनी ओझीच वाहिली पुरातन डोक्यांची
भ्रामक प्रतिमांसारखे आरशातले जिणे,
टाकून देणे
ज्यांना कधी जमलेच नाही.
किंवा मधूनच भेटत गेले फक्त
पुराण्या इतिहासाचे पवाडे गात फिरणारे
वाघ्या मुरळी किंवा
पहात असे कित्येक पुरुषसिंह
ज्यांच्या गर्जना विरल्या गळ्यातल्या गळ्यात
गिरक्या घेऊन
आणि वरून कोसळत राहिला पाऊस मुसळधारांनी.
कदाचित आता आहोत तिथूनच,
लागेल
शहरं वजाजाता, उरलेल्या वस्त्यात जागून
गस्त घालावी, आदिम अंधारालाही आठवून
उद्घोष प्रकाशाचा

कदाचित्
उद्याचा सूर्य उगवण्या पूर्वीच
करावी लागेल मुक्रर
ह्या देशाच्या आकाशाची पूर्वदिशा,
वाटांनाच व्हावे लागेल भूमिगत
एकटे सोडून राजरस्त्यांना, एकटेच
कधीही न उगवत्या सूर्यासाठी कदाचित
ह्या इथूनच सुरू झाल्यात वाटा भूमिगत.
कोसळत्या धारांत, अंधारात
भिजायला धजावून
ह्या आदिम रात्रीतून
प्रकाश शोधायला
माझ्या देशाच्या अस्तंगत आकाशातून !

नागपूर अनिल बांदेकर

REFBK-0021693
REFBK-0021693